cmyk

## संपादकीय

### लोकशाही संरचनेलाच धोका

देशाचे माजी सॉलिसिटर जनरल हरिश साळवेंसह ६०० हून अधिक ज्येष्ठ वकिलांनी देशाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांना एक पत्र पाठवले असून त्यात काही विशिष्ट लोकांचा समूह आपल्या राजकीय अजेंड्यासाठी न्यायपालिकेवर दबाव टाकण्याचा आणि न्यायालयाच्या बदनामीचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप केला आहे. न्यायपालिकेला या कथित हल्ल्यांपासून वाचवण्यासाठी पावले उचलण्याची विनंतीही या वकिलांनी सरन्यायाधीशांना केली आहे. देशाची न्यायव्यवस्था धोक्यात असून, न्यायालयीन विश्वास आणि सौहार्द कमकुवत करण्याचा प्रयत्न केला जात आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### ठाकरे पिता-पुत्र दिल्लीत दाखल

दिल्ली: ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि आ. आदित्य ठाकरे दिल्लीत दाखल झाले आहेत. इंडिया आघाडी रामलीला मैदानावर रविवारी (दि.३०) दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेबाबत निषेध प्रदर्शन करणार आहे. उद्याच्या इंडीया आघाडीच्या रामलीला मैदानावरील निषेध प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी ठाकरे पिता - पुत्र दिल्लीत पोहोचले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मोदी सरकारवर हल्लाबोल करण्यासाठी इंडिया आघाडी सज्ज झाली आहे. दिल्लीतील निषेध प्रदर्शनासाठी शरद पवारही उपस्थित राहणार आहेत.


बीड - महाराष्ट्र | वर्ष - ०३ | अंक-३४८ | रविवार दि.३१ मार्च २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | ▪ पाने- ६ | किंमत ३ रूपये


# कापसाची सरकारी खरेदी घटली

## मार्च अखेर देशात ३२.८५ लाख गाठी कापसाची खरेदी, एकूण उत्पादनापैकी केवळ १० टक्केच कापूस शासनाकडे, हमी भावापेक्षा खुल्या बाजारात अधिक दर

**पुणे । प्रतिनिधी**

**मागील दीड महिन्यापासून खुल्या बाजारात कापसाचे दर किमान आधारभूत किमतीपेक्षा अधिक राहिल्याने सरकारी कापूस खरेदी घटली आहे. बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना सध्या हमीभावापेक्षा अधिकचा दर मिळत आहे. ज्यामुळे शेतकरी सरकारी कापूस खरेदी केंद्राऐवजी थेट बाजारात विक्री करण्यावर भर देत आहेत. भारतीय कापूस महामंडळाने (सीआयआय) २०२३-२४ या संपूर्ण वर्षात किमान आधारभूत किमतीने (एमएसपी) एकूण ३२.८५ लाख गाठी (१ गाठ म्हणजे १७० किलो) कापसाची खरेदी केली आहे. यातील सर्वाधिक कापूस खरेदी ही तेलंगणा या राज्यामध्ये करण्यात आली.**

भारतीय कापूस महामंडळाच्या आकडेवारीनुसार, २०२३-२४ यावर्षी आतापर्यंत तेलंगणामध्ये यावर्षी २४ लाख कापूस खरेदी करण्यात आला आहे. तर महाराष्ट्रामध्ये एकूण २.४४ लाख गाठी कापूस खरेदी करण्यात आला आहे. याशिवाय आंध्रप्रदेश या राज्यामध्ये १.३० लाख गाठी कापूस, तर मध्य प्रदेश या राज्यामध्ये आतापर्यंत १.२७ लाख गाठी कापूस खरेदी करण्यात आला आहे. गुजरात या राज्यामध्ये ०.९१ लाख गाठी कापूस, ओडिसामध्ये ०.९५ लाख गाठी, कर्नाटकमध्ये ०.६२ लाख गाठींची कापसाची खरेदी करण्यात आली आहे. याशिवाय राजस्थानमध्ये ०.५२ लाख गाठी, हरियाणा ०.४३ लाख गाठी,

◀◀ पान २ वर



### कापसाचे दर स्थिर

राज्यातील बाजार समित्यांमध्ये कापसाला ७,५०० ते ७,८०० रुपये प्रति क्विंटलचा दर मिळत आहे. तर काही बाजार समित्यांमध्ये कापसाचे दर सध्या ८३०० रुपये प्रति क्विंटलवर स्थिर असल्याचे पाहायला मिळत आहे. कापूस व्यापारातील जाणकारांच्या म्हणण्यानुसार, सध्या देशातील बाजार समित्यांमध्ये दररोज एकूण ८०,००० ते १,००,००० लाख गाठी कापूस आवक होत आहे. तर देशातील दररोजची एकूण मागणी ही ८५,००० गाठी इतकी आहे. ज्यामुळे सध्या गुणवत्तापूर्ण कापसाला चांगला दर मिळत आहे.

# राष्ट्रवादी शरद पवार गटाची पहिली यादी जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी शरद पवार गटाची लोकसभेसाठी शनिवारी पहिली यादी जाहीर झाली. यामध्ये सुप्रिया सुळे यांच्यासह अमोल कोल्हे, निलेश लंके यांच्यासह आणखी काही नेत्यांची नावे या यादीत आहेत. पत्रकार परिषदेत शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ही माहिती दिली.

महाविकास आघाडीतील ठाकरे गटाने १७ उमेदवारांची यादी आधीच जाहीर केली आहे. त्यापाठोपाठ आता राष्ट्रवादी शरद पवार गटाने काही नावांची घोषणा केली आहे. ही यादी मिळाल्यानंतर कार्यकर्त्यांनी आपआपल्या मतदारसंघात आनंदोत्सव साजरा केला आहे.

### शरद पवार गटाच्या पहिल्या यादीतील नावे

यामध्ये बारामती लोकसभा मतदारसंघातून सुप्रिया सुळे, शिरुर लोकसभा मतदारसंघातून डॉ. अमोल कोल्हे, वर्धा लोकसभा मतदारसंघातून अमर काळे, दिंडोरी मधून भास्करराव भगरे तर नीलेश लंके यांना अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

# साडेचार वर्षानंतर तरी आमच्या गावाला ताई येणार का?

## गावागावातील मतदारांमध्ये उत्सुकता; बड्या नेत्यांच्या मात्र भेटीगाठी सुरु

**विशेष प्रतिनिधी। बीड**

**परळी मतदार संघात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत धनंजय मुंडे यांच्याकडून पराभव झाल्यावर भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे या सक्रीय राजकारणापासून अलिप्त होत्या. जिल्ह्यात काही कार्यक्रम सोडले तर त्या दिसल्याच नाहीत. आता त्यांना बीड लोकसभेची उमेदवारी मिळाल्याने त्या साडेचार वर्षानंतर तरी मते मागण्यासाठी आमच्या गावाला येणार का? या बाबत गावागावातील मतदारांमध्ये उत्सुकता आहे. तर दुसरीकडे मुंडे यांनी जिल्ह्यातील बड्या नेत्यांच्या (सच्चा कार्यकर्ता नव्हे) भेटीगाठीवर भर दिला आहे.**



गोपीनाथ मुंडे यांच्यामुळे बीड जिल्ह्याची ओळख संपुर्ण देशात झाली. त्यांची कार्य पध्दतीवर सामान्य मतदारांपासून सच्चा कार्यकर्ताही फिदा होता. साहेबांनी हात जरी वर केला तरी हजारो कार्यकर्ते पुढे येत होते. कार्यकर्त्यांची नाडी त्यांनी ओळखली होती. त्यामुळे त्यांच्या काळात कार्यकर्ता त्यांच्यापासून दुर गेला नाही, उलट नेत्यांनी त्यांची साथ सोडून त्यांना अडचणीत आणले. तरीही सच्चा कार्यकर्त्यांच्या जीवावर गोपीनाथ मुंडे यांची जादुची कांडी बीडच नव्हे तर संपुर्ण राज्यात फिरत होती. त्यामुळे त्यांच्या नावाचा दरारा पक्षासह इतर पक्षांच्या नेत्यांमध्येही होता. त्यांच्या नंतर पंकजा मुंडे यांनी गोपीनाथ मुंडे यांचा राजकीय वारसा सक्षमपणे पुढे चालु ठेवला. पाच वर्ष त्या फडणवीस सरकारमध्ये मंत्री होत्या. बीड जिल्ह्यासाठी त्यांनी हजारो कोटींचा निधीही आणला तरीही त्यांचा परळी मतदारसंघात २०१९ मध्ये पराभव झाला. वैद्यनाथ साखर कारखाना बंद झाला, हजारो ऊस उत्पादकांचे अतोनात नुकसान झाले. पराभव झाल्यानंतर गेली साडेचार वर्ष पंकजा मुंडे या बीड जिल्ह्याच्या राजकारणात सक्रीय

◀◀ पान २ वर

### सच्चा कार्यकर्ताच महत्वाचा!

सच्चा कार्यकर्ता काय करु शकतो, याची जाणीव यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब ठाकरे, गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख, शरद पवार यांच्यापासून ते आजच्या काही नेत्यांपर्यंत आहे. निवडणुकीत विजय मिळाला तर तो सच्चा कार्यकर्त्याच्या धावपळीतून, नियोजनातून, ईमानदारीतून आणि धाडसातून मिळत असतो. तो विजय अडगळीत पडलेल्या मोठ्या नेत्यांमुळे कधीच मिळत नसतो. त्यामुळे सच्चा कार्यकर्ता महत्वाचा मानून त्याला ताकद देणे काळाची गरज आहे. नेते येतात, जातात, मात्र कायम राहते ते नेतृत्व आणि सच्चा कार्यकर्ता.

### नवाब मलिक यांची प्रकृती बिघडली

मुंबई: कुर्ला येथील जमीन गैरव्यवहार प्रकरणामुळे अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) रडारवर आलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांची प्रकृती बिघडली आहे. सध्या ते वैद्यकीय कारणामुळे जामिनावर तुरुंगाबाहेर आले आहेत. शनिवारी दुपारी नवाब मलिक यांची प्रकृती बिघडल्याची माहिती त्यांची मुलगी सना मलिक हिने दिली. त्यानंतर त्यांना कुर्ला येथील रुग्णालयात आपत्कालीन कक्षात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांची एक टीम त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहे. त्यांना श्वसनासंदर्भात त्रास होऊ लागल्यानंतर ते रुग्णालयात आले. मलिक यांच्यावर आता कुर्ला येथील क्रिटिकेअर सेंटर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# राष्ट्रवादीच्या कोट्यातून महादेव जानकर यांना परभणीची उमेदवारी



**मुंबई । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातून परभणी लोकसभेची जागा राष्ट्रीय समाज पक्षाला (रासप) देण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसने घेतला असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

या पत्रकार परिषदेला रासपचे नेते महादेव जानकर, क्रीडामंत्री संजय बनसोडे, प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे आदी उपस्थित होते. सुनिल तटकरे पुढे बोलताना म्हणाले की, राष्ट्रीय समाज पक्षाला जागा देताना महायुतीचे उमेदवार म्हणून महादेव जानकर हे निवडणूक लढवणार असून त्यांनी महाराष्ट्रात धनगर समाजाची एक चळवळ, आरक्षणाचा लढा उभा केला आहे. त्यांचे योगदान समाजासाठी मोठया प्रमाणात असल्यानेच परभणीची उमेदवारी घोषित करत असून अतिशय चांगल्या फरकाने ते विजयी होतील असा विश्वास यावेळी व्यक्त केला. पुढे बोलताना सुनिल तटकरे म्हणाले की, हा निर्णय घेताना परभणी जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. राजेश विटेकर, बाबाजानी दुर्रानी, प्रतापराव देशमुख यांच्यासोबत

◀◀ पान २ वर

### सुनिल तटकरे यांची माहिती

# अपक्षही नाही अन् पाठिंबाही नाही, ज्याला पाडायचे त्याला पाडा!

## लोकसभा निवडणुकीबाबत जरांगे पाटील यांची मोठी घोषणा

**जालना । प्रतिनिधी**

**प्रत्येक गावातून आलेल्या अहवालातून अपक्ष उमेदवार देता येणार नाही. त्यामुळे लोकसभा निवडणूकीत मराठा समाजाने पडण्याची गरज नाही. परंतु ज्याला पाडायचे आहे त्याला पाडा, असे आवाहन शनिवारी जरांगे पाटील यांनी केले. ते अंतरवाली सराटीत पत्रकारांशी संवाद साधत होते.**

यावेळी बोलताना ते म्हणाले की, राजकारण हा माझा विषय नाही, मात्र समाजाची इच्छा आहे, म्हणून लोकसभा



निवडणुकीबाबत निर्णय घेण्यात आला आहे. गावागावातून आलेल्या अहवालानंतर निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे- पाटील यांनी दिली. काहीजण उमेदवाराच्या नावाखाली

◀◀ पान २ वर

### पूर्णा येथे मराठा समाजाकडून सर्वपक्षीय उमेदवारांना घरबंदी

**पूर्णा:** मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यासाठी राज्य शासनाने सगेसोयरे अधिसूचना काढली. परंतु, तसा कायदा पारीत करुन अंमलबजावणी केली नसल्यामुळे पूर्णा तालुक्यातील लक्षावधी मराठा समाज फसवणूक करणाऱ्या सत्ताधाऱ्यांविरुध्द पेटून उठला आहे. त्यामुळे विविध पक्षांचे राजकीय पुढारी, आमदार,



खासदार यांना आता घरबंदी केली आहे. यात महिला वर्ग मोठ्या संख्येने उतरला आहे. सर्वपक्षीय

◀◀ पान २ वर



### नरसिंह राव, चरणसिंह, कर्पुरी ठाकूर, स्वामीनाथन मरणोत्तर भारतरत्नने सन्मानित

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव, माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंह, कृषी क्षेत्रात क्रांती घडवणारे डॉ. एम. एस. स्वामीनाथन आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पुरी ठाकूर यांना शनिवारी मरणोत्तर भारतरत्नने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांच्या कुटुंबीयांनी हा देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार स्वीकारला.**

माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांचा मुलगा पी. व्ही. प्रभाकर राव, एम. एस. स्वामीनाथन यांची मुलगी डॉ. नित्या राव, कर्पुरी ठाकूर यांचा मुलगा रामनाथ ठाकूर आणि चौधरी चरणसिंह यांचा नातू जयंत चौधरी यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते भारतरत्न पुरस्कार स्वीकारला. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी

◀◀ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३० मार्च २०२३**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ३२.५० क्विंटल | २,२४० | ३,१२० | २,५८७ |
| ज्वारी/हायब्रिड :१०४.०० क्विंटल | १,५०० | ३,३९० | २,५९५ |
| मूग :०.५० क्विंटल | ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| तूर : ३.५० क्विंटल | ४,००० | ९,६०० | ७,२७५ |
| उडीद : २.०० क्विंटल | ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| बाजरी: ७.०० क्विंटल | २,३०१ | २,७६० | २,५६३ |
| चिंचोका/लोकल: ४.०० क्विंटल | १,९०० | १,९०० | १,९०० |
| सोयाबीन: ७४.०० क्विंटल | ४,४०० | ४,४११ | ४,४०२ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,३५० | ५,४५० | ५,३८३ |

# अखेर सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब

## बारामतीत नणंद विरुद्ध भावजय असाच सामना रंगणार, दोघींच्याही अधिकृत उमेदवारी जाहीर

**बारामती । प्रतिनिधी**

**बारामती लोकसभा मतदारसंघातून सुनेत्रा अजित पवार या उमेदवार असतील, अशी घोषणा राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शनिवारी (दि. ३०) केली. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाकडूनही शनिवारी जाहीर झालेल्या यादीत बारामतीतून विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांनाच उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे आता बारामतीत अधिकृतपणे नणंद विरुद्ध भावजय असाच सामना रंगणार असल्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.**



गेली दीड महिने अजित पवार गटाकडून सुनेत्रा पवार याच उमेदवार असतील याचे स्पष्ट संकेत देण्यात आले होते. खुद्द सुनेत्रा पवार या गेल्या महिनाभरापासून प्रचारात व्यस्त आहेत. मतदारसंघातील सहाही विधानसभा क्षेत्रात त्या प्रचार करत आहेत. त्यांच्या नावाची औपचारिक घोषणा बाकी होती, शनिवारी ती झाली. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाकडून सुप्रिया सुळे यांची उमेदवारी पक्की होती. त्यामुळे त्या गेली तीन महिन्यांपासूनच प्रचारात व्यस्त आहेत. बारामतीत प्रथमच पवार विरूध्द पवार अशी लढत होणार असल्याने अनेक तर्कवितर्क लढविले जात आहेत. दोन्ही बाजूंची प्रतिष्ठा येथे पणाला लागली आहे. संपूर्ण देशातील राजकीय वर्तुळाचे या लढतीकडे लक्ष आहे.

### लढतीकडे देशाचे लक्ष

बारामतीत आता नणंद विरुद्ध भावजय असा सामना रंगणार असून यंदाची ही निवडणूक कमालीची लक्षवेधी ठरणार आहे. राज्यासह देशाचे लक्ष या निवडणूकीकडे लागले आहे. महायुतीकडून सुनेत्रा पवार लढणार आहेत. तत्पूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी इंदापूरातील माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, पुरंदरमध्ये माजी मंत्री विजय शिवतारे यांची समजूत काढली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यात महत्त्वाची भूमिका बजावली.

cmyk

अग्रलेख

# लोकशाही संरचनेलाच धोका

देशाचे माजी सॉलिसिटर जनरल हरिश साळवेंसह ६०० हून अधिक ज्येष्ठ वकिलांनी देशाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांना एक पत्र पाठवले असून त्यात काही विशिष्ट लोकांचा समूह आपल्या राजकीय अजेंड्यासाठी न्यायपालिकेवर दबाव टाकण्याचा आणि न्यायालयाच्या बदनामीचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप केला आहे. न्यायपालिकेला या कथित हल्ल्यांपासून वाचवण्यासाठी पावले उचलण्याची विनंतीही या वकिलांनी सरन्यायाधीशांना केली आहे. देशाची न्यायव्यवस्था धोक्यात असून, न्यायालयीन विश्वास आणि सौहार्द कमकुवत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे तिचे एका विशिष्ट गटाच्या दबावापासून संरक्षण करणे आवश्यक असल्याचे पत्रात म्हटले आहे.

या पत्रामुळे देशातील न्यायवर्तुळात खळबळ उडाली आहे. सरन्यायाधीशांना पत्र लिहिणाऱ्या वकिलांमध्ये बार कॉन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मननकुमार मिश्रा, आदिश अग्रवाल, चेतन मित्तल, पिंकी आनंद, उज्ज्वला पवार, उदय होला, हितेश जैन, स्वरूपमा चतुर्वेदी यांच्यासह अनेक वकिलांचा समावेश आहे. पत्र लिहिणाऱ्या वकिलांनी कुठल्याही विशिष्ट प्रकरणांचा उल्लेख केलेला नसला तरी न्यायालयांमध्ये विरोधी पक्षांच्या नेत्यांचा संबंध असलेल्या अनेक फौजदारी प्रकरणांच्या सुनावणीचे पडसाद त्यावर उमटू शकतात. पत्रात कोणाचेही थेट नाव घेण्यात आलेले नाही. मात्र, दबावाच्या डावपेचामुळे लोकशाही संरचनलेला धोका उत्पन्न झाला असून न्यायालयासाठीही ते हानीकारक आहे असे म्हटले आहे. पत्रात पुढे म्हटले आहे की, न्यायव्यवस्थेवर एका विशिष्ट गटाचा राजकीय हस्तक्षेप वाढत आहे. सध्या न्यायालयीन कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण करणे, न्यायालयाच्या कामकाजाविषयी जनतेच्या मनातील विश्वासार्हता कमी करणे या बाबी या गटाकडून मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. राजकीय अजेंड्याच्या माध्यमातून कोर्टाच्या निर्णयावर टीका केली जात आहे. काही नेते विरोधी नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप करतात. हे प्रकरण कोर्टात असेल आणि आरोप करणाऱ्या नेत्याच्या मनासारखा निकाल लागला नाही, तर ते माध्यमांचा आधार घेऊन कोर्टावर टीका करतात. नेत्यांकडून सोशल मीडियावर खोटेनाटे पसरवले जात आहे.

राजकीय सत्तेच्या माध्यमातून कोर्टाच्या निर्णयावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही बाब कोणत्याही स्थितीत स्वीकारार्ह नाही. काही वकील दिवसा राजकारण्याचा खटला लढतात आणि रात्री प्रसारमाध्यमांसमोर जातात. त्यामुळे निर्णयावर प्रभाव पडू शकतो. ही कृती केवळ न्यायालयांचाच अनादर करणारी नाही, तर बदनामीही करणारी आहे. हा न्यायालयाच्या प्रतिष्ठेवरचा हल्ला आहे. कायदा टिकवून ठेवण्याचे काम करणाऱ्या व्यक्तीने न्यायालयाच्या बाजूने उभे राहिले पाहिजे. आता एकत्र येऊन आवाज उठवण्याची वेळ आली आहे. छुप्या पद्धतीने हल्ले करणाऱ्यांच्या विरोधात बोलण्याची वेळ आली आहे. वकिलांच्या व्यथा सर्वसामान्यांना स्पष्टपणे दिसतात, लक्षात येतात परंतु ते या संदर्भात काही करू शकत नाहीत. न्यायालये लोकशाहीचे आधारस्तंभ राहतील याची काळजी वकिलांनीच घ्यायला हवी.

या पत्रामुळे देशभरातील न्याय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. गत काळात सर्वोच्च न्यायालयाने काही महत्त्वपूर्ण निकाल दिले. यातील अनेक निकाल हे राजकीय प्रकरणांशी संबंधित होते. त्यामुळे वकिलांच्या पत्रातील आरोप त्या संदर्भातच असल्याचे म्हटले जात आहे.

गत काही वर्षांत राजकीय भ्रष्टाचार प्रचंड प्रमाणात वाढला आहे. अशी प्रकरणे न्यायालयात गेली की न्यायपालिकेवरच दबाव आणण्याचा प्रयत्न केला जातो. असे प्रकार लोकशाहीच्या पायाला आणि न्यायप्रक्रियेवर असलेल्या विश्वासाला धोका निर्माण करणारे आहेत. स्वत: सरन्यायाधीशांनीही गतवर्षी एका वेगळ्या विषयावर बोलताना याबाबत चिंता व्यक्त केली होती. राजकीय नेत्यांचे सोंग-ढोंग होत राहतील परंतु न्यायपालिकेवरील वाढता दबाव झुगारून द्यायलाच हवा. कारण त्यावरच लोकशाहीचे अस्तित्व अवलंबून आहे.

## गेवराई येथे होक्युअर हेल्थकेअर कंपनीचा शुभारंभ

**गेवराई । प्रतिनिधी**

**खरात फॅमिली ही गेवराई तालूक्यातील एक आदर्श कुटुंब आणि सामाजिक भान असणारे कुटुंब म्हणून ओळखले जाते. या सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक सिताराम परभतराव खरात यांचे चिरंजीव संभाजी सिताराम खरात व त्यांचें सहकारी मित्र बळीराम विठ्ठल खरात यांच्या संकल्पनेतून होक्युअर हेल्थकेयर प्रायव्हेट लिमिटेडने या कंपनीची सुरुवात झाली.**

या कंपनीचें लॉन्चिंग दिनांक २३- ३- २०२४ रोजी साई सिद्धि हॉल कोल्हेर रोड, गेवराई येथे थाटात संपन्न झाले. यावेळीं कंपनीबद्दल, कंपनींच्या प्रोडक्शन बद्दल, फ्युचर प्लॅनबद्दल संभाजी खरात व बळिराम खरात यांनी माहिति दिली.या कार्यक्रमास गेवराई येथील डॉ.गणेश फलके, डॉ. लेंडगुळे, डॉ.खरात, डॉ.जाधव, डॉ.देशपांडे, डॉ.झिंजुर्डे, डॉ. प्रशांत पाटील, डॉ.काला आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व डॉक्टरांनी कंपनीच्या प्रॉडक्टबद्दल आणि कॉलिटी बद्दल विश्वास दाखवून कंपनीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी गेवराई व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रताप खरात, गुलमेश्वर ऍग्रो लिमिटेडचे कार्यकारी संचालक संजय खरात, बीड जिल्हा पेट्रोल पंप संघटनेचे अध्यक्ष शरद खरात, मंगेश खरात,धनंजय खरात, सतीश खरात, ह.भ.प. पावशे महाराज, दैठणचे माजी उपसरपंच नीलकंठ पंडित आदी मान्यवर उपस्थित होते. होक्युअर हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेडची निर्मिती ही बेस्ट क्वालिटी मेडिसीन गरजू रुग्णांपर्यंत पोहचण्यासाठी झाली असून त्यासाठी कंपनी कटीबद्ध राहील, असे आश्वासन संचालक मंडळाने दिले आहे.

## जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कामांचा तसेच पाणीटंचाईचा घेतला आढावा

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी पाणी, चारा टंचाई , मनरेगा तसेच ३९ बीड लोकसभा निवडणूकच्या अनुषंगाने २३०-बीड विधानसभा मतदार संघाची आढावा बैठक मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीतील तहसील कार्यालयात आज झाली.**

या बैठकीस जिल्ह्यातील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी , सुहास हजारे तसेच विविध विभागांचे कार्यालयीन प्रमुख यावेळी उपस्थित होते. यावेळी बीड तालुक्यातील पाणी, चारा टंचाई तसेच निवडणूक ही संदर्भात केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला आणि नागरिकांना पाण्याची कमतरता होणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश दिले. जिल्ह्यात चारा वाहतूक बंदी असून पशुधनाला चाराने कमी पडणार



नाही याची काळजी घ्यावी असे सांगितले. निवडणुकीच्या काळात महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत अपूर्ण कामे पूर्ण केली जाऊ शकतात त्यामुळे या अंतर्गत असणारी कामे सुरू ठेवण्याबाबत निर्देशित केले. बीड जिल्ह्यातील २३० बीड विधान सभा मतदारसंघात आचारसंहितेचे सर्व नियमांचे पालन व्हावे तसेच कुणीही आदर्श आचारसंहितेच भंग होणार नाही याची काळजी घ्यावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केल्या. विविध निवडणूक कक्षाला यावेळी जिल्हाधिकारी यांनी भेट दिली. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ३९ बीड लोकसभा मतदारसंघातील २३० बीड विधानसभा मतदारसंघाची स्ट्राँग रूम कृषी उत्पन्न बाजार समिती येथे असणार आहे. या जागेची आज जिल्हाधिकारी यांनी पाहणी करून पूर्वतयारीचा आढावा घेतला. तसेच गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक येथे ३९ बीड मतदार संघाच्या मतदानानंतर म्हणजे १३ मे नंतर ते मतमोजणी म्हणजे ४ जूनपर्यंत ईव्हीएम मशीन येथे राहणार असून या जागेची पूर्वतयारी कशी सुरू आहे याचाही आढावा आज जिल्हाधिकारी यांनी घेतला.

## पान १ वरून...

### कापसाची सरकारी

पंजाब ०.३८ लाख गाठी कापूस खरेदी करण्यात आला आहे. दरम्यान, देशातील एकूण कापूस उत्पादनापैकी सीआयआयकडून आतापर्यंत १० टक्के कापसाची सरकारी खरेदी करण्यात आली आहे. दरम्यान, सीआयआयकडून चालू हंगामातील कापूस उत्पादनाचा सुधारित अंदाज ३२३.११ लाख गाठी इतका वर्तवण्यात आला आहे. जो नोव्हेंबर २०२३ मध्ये ३१६.५७ लाख गाठी इतका वर्तवण्यात आला होता.

------------

### साडेचार वर्षानंतर तरी आमच्या गावाला

नव्हत्या. या दरम्यान गावागावातील सच्चा कार्यकर्त्यांना त्यांची उणिव भासत होती. त्यांनी जिल्ह्यातील जनसंपर्क कमी करणे कोणालाही अपेक्षित नव्हते. मात्र पंकजा मुंडे यांनी एकदा ठरवले की त्या पुन्हा कोणाचेही ऐकत नाहीत? असा संदेशही या काळात गावागावातील लोकांपर्यंत गेला होता. त्यामुळे त्या या काळात आपल्याला भेटायला येणार नाहीत, हे सामान्य नागरीकांना माहित होते. तसेच पुढे काय असे म्हणत आपल्या नेत्याविषयी समर्थकांना काळजीही होती. साडेचार वर्षानंतर त्यांना बीड लोकसभेची भाजपकडून उमेदवारी मिळाली. त्यानंतर त्यांनी प्रचार सुरु केला, मोठ्या नेत्यांच्या भेटीगाठीचा जिल्हाभर सपाटा लावला, सर्व काही जोरात सुरु आहे. त्यामुळे आता साडेचार वर्षानंतर मते मागायला तरी पंकजाताई आमच्या गावाला येणार का? असा सवाल गावागावातील सच्चा कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे.

------------

### राष्ट्रवादीच्या कोट्यातून महादेव

राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी प्रदीर्घ चर्चा केली. त्या चर्चेनंतर महादेव जानकर हे महायुतीचे उमेदवार असतील अशी घोषणाही करण्यात आल्याचे सांगण्यात आले. सुनिल तटकरे परभणीतील कार्यकर्त्याबाबत बोलताना म्हणाले की, राजेश विटेकर हे अतिशय चांगले पदाधिकारी आहेत. मागील निवडणुकीत त्यांचा थोडाशा फरकाने पराभव झाला आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणूनही त्यांनी उत्तम काम केले आहे. त्यामुळे त्यांच्यामार्फत एका तरुण कार्यकर्त्याला सन्मानपूर्वक योग्य ती संधी देण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्लमेंटरी बोर्ड नक्की घेणार आहे, अशी माहितीही पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना त्यांनी दिली.

-------------

### नरसिंह राव, चरणसिंह, कर्पुरी ठाकूर,

यांनाही शनिवारीच भारतरत्न पुरस्कार देण्यात येणार होता. मात्र प्रकृतीच्या कारणास्तव ते राष्ट्रपती भवनामध्ये उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांना रविवारी ३१ मार्च रोजी घरी जाऊन सन्मानित केले जाणार आहे. अडवाणी यांच्याव्यतिरिक्त उर्वरित चौघांना मरणोत्तर भारतरत्नाने सन्मानित करण्यात आले.

-------------

### अपक्षही नाही अन् पाठिंबाही

वर्गणी जमा करत असेल, तर ही कृती योग्य नाही, असे सांगून या निवडणुकीत एक रुपयाही लागणार नाही. त्यामुळे असली दुकाने कोणीही सुरू करू नयेत. ज्यांनी असे केले असेल तर त्यांनी ते परत करावे, नाहीतर त्यांना मीडियासमोर वाजवल्याशिवाय राहणार नाही, असा सज्जड दमही वर्गणी जमा करणाऱ्या कार्यकर्त्यांना जरांगे यांनी दिला आहे.

### पूर्णा येथे मराठा समाजाचाकडून सर्वपक्षीय उमेदवारांना घरबंदी

नेते झाले बहिरे, आमची मागणी सगेसोयरे, सर्वपक्षीय नेत्यांना आणि त्यांच्या समर्थकांना घरबंदी'', अशा ठळक शब्दांत नमूद केलेले फलक घरावर लावण्यात येणार आहेत. त्यामुळे ऐन निवडणुकीत विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांची चांगलीच कोंडी होणार आहे. तसेच अनेक समस्यांचा सामना करणे, मुश्किल होणार आहे. आपण आजवर अनेकांना मतदान करुन मोठे केले. त्यांनी आपल्यासाठी काहीच केले नाही, आरक्षणावर ब्र शब्द काढला नसल्याने आता मराठा समाज एकवटला आहे.

## राष्ट्रीय महामार्गाच्या कामावर प्रश्नचिन्ह

**परळी । प्रतिनिधी**

**परळी तालुक्यातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ फ चे विस्तारीकरण काम पहिलेच अतिशय संथ गतीने सुरू असून नाथरा फाटा ते सिरसाळा ह्या कामावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. मुख्य रस्ता उकरून त्याची खोलीकरण न करता भर टाकून रस्त्याचे काम सुरू आहे. पर्यायी रस्ता पूर्ण तयार न करता मुख्य रस्ता उकरून टाकल्याने दुचाकी वाहन धारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.**

राष्ट्रीय महामार्गामुळे परळी शहराचा पर्यायी तालुक्याचा विकास होत असून या कामी सूड बुध्दीजिवी प्रमाणे हे काम करणाऱ्या कंत्राटदाराकडून रस्त्याचे काम सुरू आहे. मागील दहा महिन्यापासून हे काम सुरू असून अद्याप एक बाजूचे काम देखील सिरसाळ्या पर्यंत परीपूर्ण झालेले नाही. पर्यायी रस्ता उपलब्ध न करता संपूर्ण रस्ता खोदून काढल्याने वाहन धारकांची चांगलीच तारांबळ उडत आहे.नाथरा फाटा येथून सिरसाळा दिशेने सुरू असलेले काम अतिशय निकृष्ठ दर्जाचे होत असून मुख्य रस्ता उकरून त्याचे खोलीकरण न करता त्यावर मुरूम टाकण्यात येत आहे. एक फूट देखील या रस्त्यावर खोदकाम न करता मुरूम टाकून दबई करण्यात येत आहे. मुख्य रस्ता उकरून पर्यायी रस्ता देखील व्यवस्थित करण्यात आलेला नसून त्यावर पाणी देखील मारण्यात येत नसल्याने वाहनधारकांना मोठ्या धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. दररोज हजारो चाकरमानी या रस्त्यावरून ये-जा करत असून रस्त्यामुळे होत असलेली गैरसोय लक्ष्यात घेऊन महामार्ग प्राधिकरण अधिकारी, जिल्ह्याचे खासदार डॉ.प्रीतम मुंडे-खाडे व कंत्राटदार यांची नोव्हेंबर २०२३ मध्ये बैठक संपन्न झाली. या बैठकीत डिसेंबर मधील पहिल्या आठवड्यात एकेरी रस्ता वाहतुकीसाठी पूर्ण करू असे आश्वासन कंत्राटदाराने दिले मात्र या बैठकीत दिलेल्या सूचनेनुसार काम तर सोडाच आहे ते काम पण निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप वाहनधारक करत आहेत.





## हरीओम घोडके यांच्या प्रथम पुण्यस्मरण प्रसंगी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप

म्हसोबावाडी । पतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथे युवा नेते ग्रामपंचायत सदस्य हरीओम घोडके यांचे गेल्यावर्षी अपघाती दुःखत निधन झाले होते ते नेहमीच समाजकार्यासाठी तत्पर होते याच अनुषंगाने त्यांच्या प्रथम पुण्यस्मरण प्रसंगी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सुळेमान देवळा येथे खावू वाटप केला .बघता बघता एक वर्ष उलटून गेले,पण ना तुझा हरीओम घोडके यांचा सहवास संपला ना अनमोल पेरलेल्या आठवणी संपल्या. हरीओम तु आजही त्यांच्या कार्यात आज ही सर्व जनतेत आहे असा विश्वास मित्र परिवार बोलतं आहे कारण शरीर नष्ट होतं पण आत्मा जीवंतच राहतो.

## बालिका कथाकारांनी ग्रंथोत्सवात कथाकथनाने जागविल्या संवेदना..!

**बीड । प्रतिनिधी**

**शांती निकेतन शिरूर कासार तालुका येथील शाळांतील बालिका कथाकारा, प्रतिक्षा जगताप, स्नेहल व्हावळे , साक्षी गायकवाड, आराध्य नागरगोजे, प्रतिभा मुंढे, गायत्री सवंडकर यांनी आपल्या शैलीत कथाकथन करुन रसिक श्रोत्यांच्या ह्रदयाला हात घालत संवेदना जागविल्या. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग,ग्रंथालय संचालनालय, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्यावतीने बीड आयोजित योगेश्वरी महाविद्यालय अंबाजोगाई नागपूरकर सभागृहात आयोजिलेल्या दोन दिवसीय ग्रंथोत्सव २०२३ मध्ये आजचा दुसरा दिवस.**

ज्येष्ठ कवी साहित्यिक डॉ भास्कर बडे यांच्या अध्यक्षतेखाली बालकांचे कथाकथन हा ग्रंथोत्सवाच्या दुसर्या दिवशीचा पहिले सत्र झाले.यात कथा प्रभावीपणे सादर केली, वडील व आई वर कथा सांगून आई वडील नसलेल्या मुलाचे शिक्षिकेने मनोभावविश्व समृध्द करुन त्यांच्या जीवनाला उभारी कशी दिल्याचे



सांगितले. सांगितली कथाकथनात भाग घेवून चुणूक दाखविली.या सहभागींना प्रमाणपत्र देवून कौतुक करण्यात आले. यावेळी अध्यक्षीय समारोपात,आजच्या कथाकथनात सहभागी झालेल्या बाल कथाकारांनी केलेल्या धाडसाचे कैोतुक करुन,विद्यार्थ्यांनी अभ्यासाशिवाय अवांतर वाचन करावे,लिहिण्याचे धाडस करावे,शाळांच्या ग्रंथालयांनी,बाल वाचकांसाठी ग्रंथालय खुले करुन द्यावे,त्यामुळे आजचे बालवाचक उद्याचे नामांकित साहित्यिक होण्यासाठी मदत होते,याचे स्वःतचे उदाहरण डॉ भास्कर बडे यांनी देवून आवाहन केले. माझ्या घरी वाचनाचा परंपरा नसताना,शाळेच्या ग्रंथालयातून पुस्तके वाचण्यासाठी मिळवण्यासाठी दहावीत बंड केले नसते तर साहित्यिक घडलो नसतो असे स्पष्ट केले.ग्रंथालय अधिकारी कार्यालयाने आयोजिलेल्या या बालकांच्या कथाकथन सत्राबद्दल अभिनंदन केले. या प्रसंगी जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के,ग्रंथालय निरीक्षक पुरूषोत्तम राऊत ,मसाप चे सचिव अंबाजोगाई यांच्यासह अनेक ग्रंथालय कर्मचारी,ग्रंथालय चालक व ग्रंथप्रेमी उपस्थित होते.

### गोपतपिंपळगाव - कुक्कडगाव परिसरातल्या दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागला

## ५२ कोटीच्या पुलामुळे रहदारीचा मार्ग होणार सुकर-आ.लक्ष्मण पवार

**गेवराई । प्रतिनिधी**

**मतदारसंघातील गोपतपिंपळगाव – कुक्कडगावला जोडणाऱ्या पुलामुळे ग्रामस्थांना उपयोग होऊन, दळणवळणाच्या माध्यमातून आर्थिक उलाढालीला मदत होईल. त्यामुळे, गोदाकाठची महत्त्वपूर्ण गावे एकमेकांना जोडली गेली पाहिजेत, अशी अपेक्षा आमदार लक्ष्मण पवार यांनी व्यक्त केली आहे. गुरूवार ता. २८ रोजी दु. एक वाजता पुल बांधकामाची पाहणी करताना ते पत्रकारांशी बोलत होते.**

गेवराई तालुक्यातील गोपतपिंपळगाव - कुकुडगाव , ही दोन गावे गोदाकाठी आहेत. बीड - जालना जिल्ह्यातील नागरीकांच्या हितासाठी गोदापात्रात पुल होणे



आवश्यक होते. येथील परिसरात असलेल्या गावांनी अनेक वेळा पुल करण्याची मागणी केली होती. आमदार पवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केन्द्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे विशेष बाब म्हणून, निधी द्यावा, अशी मागणी करून, त्याचा पाठपुरावा केला. राज्यातील आमदारांनी ग्रामीण भागातील गावांच्या सिमेंट रस्ता कामासाठी निधी मागितला होता. मात्र, आमदार पवार यांनी पुलासाठी निधी मागून, त्याचे महत्व विशेद केले होते. त्यामुळे, या पुलाच्या बांधकामासह इतर बाबींसाठी जवळपास ५२ कोटी रु चा निधी मंजूर झाला असून, सदरील कामाला सुरुवात झाली आहे. पुण्याच्या एका कंपनीला पुलाचे कंत्राट दिले असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीत कामाला गती दिली जात आहे. आमदार पवार यांनी, गुरूवारी रखरखत्या उन्हात लोखंडी पीलर व इतर साहित्याची पहाणी करून, कामासंदर्भात अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. यावेळी, पत्रकारांशी बोलताना आमदार पवार यांनी सांगितले की, अनेक वर्षांपासून गेवराई व अंबड तालुक्यातील जनतेची मागणी होती. हा पुल अत्यंत महत्त्वपूर्ण असणार आहे. गोदापात्राच्या दोन्ही बाजुला मोठ मोठी गावे आहेत. बाजारपेठे आहे. पुलामुळे दळणवळण वाढणार असून, बारमाही जाण्या-येण्यासाठी पुलाचा वापर करता येईल. या आधी, पावसाळ्यात जायची संधी नव्हती. फक्त उन्हाळ्यात जाता येत होते. लवकरच, पुलाचे काम पूर्ण होईल आणि नागरिकांना पुलाचा वापर करून जाता येणार आहे. गेवराई मतदारसंघात रस्ताचे जाळे निर्माण होत असून, त्याचा मनस्वी आनंद असल्याचे ही आ. लक्ष्मण पवार यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले आहे. यावेळी कल्याणराव तौर,परमेश्वर तौर, सरपच सुधाकर आर्दड,संतोष मस्के,गोपाल चव्हाण, भगवान तौर,लक्ष्मण तौर, गोविंद तौर, पप्पु महाराज, प्रा. येळापुरे, स्वीय सहायक संजय आंधळे, आदी उपस्थित होते गोपतपिंपळगाव येथील कार्यकर्ते, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. आ. पवार यांनी रामपुरी येथील स्व. पाटीलबा मस्के यांच्या घरी भेट देऊन मस्के कुटुंबाचे सांत्वन केले आहे

cmyk

## अखेर प्रसिद्धीमाध्यमामुळे वाहतूक विभागाला आली जाग आणि अपघातापुर्वीच वाकलेला लोखंडी पोल सरळ केला –डॉ.गणेश ढवळे

बीड:– बीड शहरातुन जाणा–या धुळे ते सोलापूर महामार्गावरील शिवराज पान सेंटर नावाने ओळखला जाणारा वर्दळीचा मुख्य चौकात दुभाजकावर असणारा दिशादर्शक लोखंडी पोल वाकलेल्या अवस्थेत कित्येक दिवसांपासून तशाच अवस्थेत होता.याविषयी ४ दिवसांपूर्वी अपघात झाल्यानंतरच वाकलेला सरळ पोल सरळ करणार का?? या सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी वाहतूक विभागाला विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने विविध दैनिकात बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर अखेर प्रसिद्धी माध्यमांमुळे जागे झालेल्या वाहतूक विभागाने पोल सरळ करण्याचे कष्ट घेतल्यामुळे संभाव्य अपघात टळण्यास मदत होणार आहे...



दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि. ३१ मार्च २०२४



# माजलगाव तालुक्यातील ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या झळा तीव्र

## ६ गावात ९ बोअरवेल अधिग्रहण तर ४ गावांची टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी

## पाण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांवर आली भटकंती करण्याची वेळ





**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

आडातच नाही तर पोहऱ्यात कुठुन येणार? अशी परिस्थिती सध्या माजलगाव तालुक्यातील ग्रामीण भागात पहायला मिळत आहे.उन्हाची तीव्रता वाढल्याने तालुक्याला पाणी टंचाईच्या झळा बसू लागल्या आहेत. प्रशासनाकडून पाणी टंचाईवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू असले तरी हे प्रयत्न तोकडे पडत असल्याचे दिसत आहे. सध्या माजलगाव तालुक्यातील दाहा ते अकरा गावा पैकी ६ गावांमध्ये खाजगी बोअरवेल प्रशासनाने अधिग्रहण करण्यात आले आहेत तर ४ गावांना टँकरने पाणी पुरवठा करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.पाणी टंचाईवर मात करण्यासाठी इतर उपाययोजना करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात उन्हाची तीव्रता अधिक जाणवू लागली आहे.उन्हामुळे बोअरवेल,विहीरी,नद्या,गंगा, साठवण तलाव,बंधारे कोरडे पडले असून धरणांचा पाणीसाठाही कमी झाला आहे, त्यामुळे पाणी टंचाईच्या झळा माजलगाव तालुक्याल्यातील ग्रामीण भागात बसू लागल्या आहेत. अनेक वाड्यात सद्यस्थितीत टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. अनेक ठिकाणी पाणी टंचाई असल्याने टँकरने पाणी पुरवठा करावा,असा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.सध्या या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.माजलगाव तालुक्यातील शहापुर मजरा,तालखेड सह २ तांडे, शिंदेवाडी (पात्रुड),उमरी बु., गोविंदवाडी व खरात आडगाव या गावात प्रशासनाने बोअरवेल अधिग्रहण करुन पाणीपुरवठा करण्यात येत आहे,तर धर्मीवाडी, गोविंदवाडी या दोन गावांत टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी प्रस्ताव तहसील कार्यालयात दाखल केले असुन अजुन त्यांना मंजुरी मिळालेली नाही,तर छोटेवाडी (रामनगर तांडा) व राजेगाव या दोन गावांनी टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी केली असुन अद्याप पर्यंत या दोन्ही गावांचा स्थळ पाहणी अहवाल झाला असुन प्रशासनानं अद्याप पर्यंत तहसील कार्यालयात प्रस्ताव सादर केलेला नाही.या ठिकाणी पाणी टंचाई असल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी करावी लागणारी भंटकती थांबविण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलली आहेत.तालुक्यातील अनेक गावात दीर्घ कालीन उपाय झाल्यावर या ठिकाणी असलेला पाणी टंचाईचा प्रश्न निकालात निघेल असा विश्वास प्रशासनाला आहे. माजलगाव तालुक्यात एक मोठं धरण,अनेक पाझर तलाव व तालुक्यातून वाहणारी गोदावरी नदी असतानाही तालुक्याला पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याचे दुर्दैवी चित्र सध्या पहायला मिळत आहे.

माजलगाव धरणा बरोबरच तालखेड,राजेगाव, टाकरवण, याठिकाणी पाझर तलावही तालुक्यात आहेत.असे असताना अनेक गावे व तांड्यांवर पिण्याचे पाणी नसल्याने महिलांना हंडाभर पाणी मिळविण्यासाठी अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागते. शासनाच्या पाणी योजना सर्वच ठिकाणी राबविण्यात आल्या असल्या तरी अर्ध्याहुन अधिक योजना स्थानिक राजकारणामुळे पुर्ण झाल्याच नाहीत. गोदावरी नदीवरील अनेक बंधाऱ्याच्या पाण्यावर अनेक गावांच्या योजना पुर्ण होवू शकतात. मात्र प्रशासनाची उदासीनता यामुळे माजलगाव तालुक्यातील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे.

## राज्यातील कर्मचाऱ्यांचे मार्चचे वेतन रमजान ईद व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती पुर्वी अदा करावे – मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

**परळी । प्रतिनिधी**

राज्यातील शासकीय/निमशासकीय कर्मचारी, शिक्षक,प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे माहे मार्चचे वेतन रमजान ईद व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जंयती पुर्वी ५ एप्रिल २०२४ पर्यंत अदा करावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व अर्थमंत्री अजीत दादा पवार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आसल्याची माहिती संघटनेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

अघाव यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, मुस्लिम बांधवांचा सर्वात मोठा व महत्त्वाचा सन रमजान ईद हा ११ एप्रिल रोजी तर महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जंयती १४ एप्रिल रोजी साजरी होत आहे. रमजान ईद व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती हे दोन्ही उत्सव राज्यात मोठ्या उत्साहात व आनंदात साजरे होतात. त्यासाठी बाजार पेठेत मोठी अर्थिक उलाढाल होते. म्हणून हे दोन्ही उत्सव मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरे करता यावेत यासाठी राज्यातील शासकिय, निमशासकीय कर्मचारी,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे माहे मार्चचे वेतन ५ एप्रिल २०२४ पर्यंत अदा करावे, अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांनी लेखी निवेदनाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आसल्याची माहिती संघटनेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.प्रसिध्दी पत्रकावर संघटनेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य अशोक मस्कले,जिल्हाध्यक्ष कालीदास धपाटे, सचिव गणेश आजबे,नागनाथ तोंडारे, परवेज देशमुख,विजय गणगे, व्यंकटराव धायगुडे,नामदेव काळे, सुभाष सेवाळे, हनुमंत घाडगे,अनुप कुसूमकर, श्रीधर गुट्टे, संजय गोरे, अलिशान काजी, श्रीहरी दहिफळे, ज्ञानोबा गडदे, राजाभाऊ नागरगोजे, राजाभाऊ राठोड,जब्बार खान, बापुराव खोतपाटील, राजेश्वर निला, बालासाहेब जाधव, बालाजी अघाव, पी.टी. पुंडकरे, उध्दव गोरे,डि.एल.कांदे, एकनाथ लांडगे, लक्ष्मण राऊत, रामलिंग गडदे,दिपक अघाव, अनंत मुंडे, संजय फड, संभाजी फुलारी, गोपीनाथ सोनवणे,रमाकांत फड, जी.एम.एरकलवाड आदिंची नावे आहेत.

## भानुदास–एकनाथ जयघोषाने बालाघाट परीसर दुमदुमला

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरात क्षेत्र अंजनवती येथुन प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी सुद्धा मठाधीपती कुमार महाराज विप्र, ह.भ.प. माणिक महाराज विप्र, ह.भ.प. शशी महाराज विप्र, ह.भ.प. विवेक महाराज विप्र यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्र पैठणकडे दिंडी नुकतीच रवाना झाली गावातील संत तुकाविप्र महाराजांच्या मठापासून या दिंडीचा प्रारंभ करण्यात येऊन अंजनवती गावांमधून निघालेल्या दिंडीचे भावीक भक्तांच्या वतीने ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. विनायक येडे, माणिकराव शिंदे, हनुमान शिंदे, परमेश्वर माळवाले, श्रीकांत येडे, कैलास



जाधव,संतोष नारायणराव जाधव,सतीश जाधव, महादेव भूमकर, अर्जुन आमटे यांनी चहा व फराळाची व्यवस्था केली. दुपारी आनंदराव आमटे यांच्या वाड्यासमोर जेवणाची व्यवस्था करण्यात आली. लिंबागणेश शिवारातील कुदळे वस्तीवर नाश्ता व सरबताची सोय केली होती. याप्रसंगी शिवमुर्ती येडे यांच्या सावता सागर सुखाचे आगर या अभंग गायनामुळे उपस्थित शेकडो वारकरी अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. क्षणभर सर्वांना आपण आरणमध्ये असल्याची अनुभूती झाली त्यानंतर श्री क्षेत्र लिंबागणेश येथील जागृत श्री भालचंद्र गणेशाला वंदन करून बाजार तळावरील पवार परिवाराच्या घरासमोर दिंडी विसावली अत्यंत भक्ती भावाने पवार कुटुंबीयांनी पालखीची मनोभावे आराधना केल्यानंतर गावातील श्री ईश्वर भारती महाराजांच्या मंदिरात दर्शन घेऊन परमपूज्य डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर मंदिरामध्ये अभंग गायन तसेच खवले दादा,हातोला यांचे प्रवचन झाले .पूर्णवादी विचाराचे निष्ठावंत पाईक साधी राहणी व उच्च विचार अंगीकारलेले अनंतराव मुळे काकांनी दिंडी चालक अर्जुन महाराज पाटील यांनी गेली २३ वर्षांपासून अखंडपणे दिंडी सुरू ठेवल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून दिंडीतील विणेकरी, मृदंगाचार्य, टाळकरी, वारकरी, माळकरी यांच्यासह सर्वांचे यथोचित स्वागत केले. त्यानंतर लिंबागणेश बस स्थानकावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भास्करराव वाणी पाटील यांनी या दिंडीला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्यानंतर दिंडी अतिशय जल्लोषात क्षेत्र पैठणकडे रवाना झाली या दिंडीमध्ये शेकडो वारकरी सहभागी झाले आहेत.

## मुख्याध्यापक हनुमान लाटे यांचा सेवा निवृत्ती गौरव उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

धारवंटा (ता. गेवराई) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक हनुमान लाटे यांचा शनिवारी (दि. ३०) सेवा निवृत्तीबद्दल पत्नी आशाबाई लाटे यांच्यासह सत्कार करण्यात आला.

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात सहशिक्षक म्हणून रुजू झाल्यानंतर हनुमान लाटे यांनी घाटसावळी तांडा, खडकी, साक्षाळपिंप्री, तरटेवाडी, दिमाखवाडी, शहाजानपूर व धारवंटा येथील जिल्हा परिषद शाळेत अध्यापनाचे काम केले. शिस्तप्रिय व विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या मुख्याध्यापक पदाच्या कार्यकाळात धारवंटा ग्रामस्थांनी शाळेसाठी २६ लाख रुपये



किंमतीची दोन एकर जमिन दान दिली. तसेच ५० हजार लिटर पाणी साठवण क्षमतेचा हौद लोकवर्गणीतून बांधून दिला. सत्कार सोहळ्याला गेवराईच्या गटविकास अधिकारी श्रीमती एम. एस. कांबळे, गटशिक्षणाधिकारी नवनाथ सोनवणे, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मिलिंद तुरुकमारे, गोविंद शेळके, बापू गायकवाड, बळीराजा शुगरचे अध्यक्ष अरुण चाळक, गोविंद शेळके, श्री. मेघारे, शांतीलाल पिसाळ, श्री. लोणकर, श्री. बारगजे, संजय दराडे, श्री. आघाव, श्री. दहीफळे, श्री. तळेकर, श्री. भवर, श्री. गवते, श्री. कुलकर्णी, श्री. घाडगे, श्री. ढगे, श्री. कोळेकर, भारत जावळे, शिवाजी सानप, सतिष शेळके, बाळासाहेब शेळके, भगवान शेळके आदींसह कुटूंबिय उपस्थित होते.



## वाघ्या–मुरूळी परिषदेच्या महिला जिल्हाध्यक्षपदी शोभाताई गायकवाड

**बीड : वाघ्या–मुरूळी परिषदेच्या बीड शहर व जिल्हा महिला विभागाच्या अध्यक्षपदी शोभाताई गायकवाड यांची वाघ्या– मुरुळी परिषदेचे अध्यक्ष प्रा.मार्तंड साठे यांनी नियुक्तीपत्र देवून केली.**

## पती नपुंसक असतानाही लग्न लावून दिले

### पतीसह सासरच्या सहा जणांवर माजलगाव शहल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**

मुलगा नपुंसक असल्याचे माहित असतानाही त्याचे लग्न लावून विवाहितेची फसवणूक व छळ केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या सहा जणांवर माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे याप्रकरणी पीडित विवाहितेने शहर पोलिसात ३० मार्च शनिवार रोजी तक्रार दाखल केली आहे.

यासंदर्भात मिळालेली माहिती अशी की,पाटोदा तालुक्यातील बेलखंडी येथील गिन्यानदेव माने आणि सुमनबाई माने यांनी २१ एप्रिल २०२२ रोजी आपला मुलगा शिवाजी माने याचे लग्न पीडित मुलीशी लावून दिले होते. लग्नानंतर वधू मुलीला आपला पती हा नपुंसक असल्याचे समजले. तिने ही बाब सासू–सासरे,नणंद यांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला.परंतु सासरच्या मंडळींनी तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले.एवढ्यावर न थांबता तिचा शारीरिक आणि मानसिक छळ केला व जीवे मारण्याची धमकी दिली.नवऱ्याकडून सतत छळ होऊ लागल्याने पीडितेने आपल्या माहेरी जाऊन याबाबत आई–वडिलांना सांगितले.त्यानंतर तिने दि ३० मार्च शनिवार रोजी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात पती शिवाजी गिन्यानदेव माने सासरे–गिन्यानदेव माने, सासू–सुमनबाई गिन्यानदेव माने,दिर– राम गिन्यानदेव माने, ननंद–आशा नाईकवाडे, तिचा नवरा दत्तात्रय नाईकवाडे सर्व रा. स्वराज्य नगर,बीड यांच्या विरूद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करत आहेत.


## शेतकऱ्यांचा कळवळा फक्त भाषणापुरताच का?

### मागील १४९ रुपयांचा हप्ता देण्यास सोळंके कारखान्याची टाळाटाळ

### जास्त भाव दिला म्हणून आ. सोळंकेंनी पाठ थोपटून घेत शेतकऱ्यांना ठेवले ताटकळत

माजलगाव । प्रतिनिधी

आमदार प्रकाश सोळके यांनी मागच्या गळीत हंगामात त्यांच्या ताब्यातील कारखाना सर्वाधिक भाव देत असल्याचे सांगत स्वतःची पाठ थोपटून घेतली. परंतु दुसरा गळीत हंगाम संपला तरी मागील १४९ रुपयांचा थकित हप्ता दिला नाही, यामुळे शेतकऱ्यांचा कळवळा फक्त भाषणात मात्र प्रत्यक्षात त्यांना ताटकळत ठेवले जात असल्याचे दिसून येत आहे. यामुळे दादा असंच भल करणार आहात का? असा प्रश्न ऊस उत्पादक शेतकरी विचारत आहेत. आमदार प्रकाश सोळंके यांचे वर्चस्व असलेला सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचा



चालू गळीत हंगाम २४ मार्चला संपला. यावर्षी कारखान्याने सहा लाखो मे.ट. पेक्षाही जास्त उसाचे गाळप केले. ही चांगली बाब आहे. परंतु गतवर्षी आमदार सोळके यांनी ऊसाला जास्त भाव देणार असल्याची घोषणा केली. स्वतःची पाठ थोपटून घेत प्रसिद्धी मिळवून घेतली. तो गतवर्षीचे वाढीव फरक १४९ रुपये

अद्याप पर्यंत शेतक–यांना दिले नाही, यावर्षी शेतकरी दुष्काळाने संकटात सापडलेला असून खरीप आणि रब्बी दोन्ही हंगातील पीक हाताचे गेल्याने हतबल आहे यामुळे शेतक–यांना दिलासा देण्यासाठी गतवर्षीच्या वाढीव उसाचे बिल देण्याची सोळके कारखाना प्रशासनाला आठवण झाली नाही. वर्ष संपून गेलं तरी शेतकऱ्यांना फक्त आश्वासनच मिळत आले असून ही रक्कम कधी देणार? सांगायला सोळके तयार नाहीत. शेतकऱ्यांनी या पैशासाठी आणखीन किती दिवस बाट बघायची ? इतर कारखान्यापेक्षा ऊसाला जास्त भाव दिला म्हणून आमदारांनी जिल्हाभर स्वतःच्या पाठ थोपटून घ्यायची अन? दुसरीकडे मात्र बिले देण्यास टाळाटाळ करायंची यामुळे शेतकऱ्यांच्या मनात कारखान्याविषयी चिड निर्माण होत असून आमदार

सोळके यांनी शेतक–यांच्या भावनेशी खेळणे बंद करावे अशी मागणी केली जात आहे

**शेतकऱ्यांचा पाडवा गोड करणार का?**

सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याकडून गतवर्षीच्या वाढीव बिलाची १४९ रुपये रक्कम शेतक–यांना पाडव्याला देऊन शेतकऱ्यांचा पाडवा कारखान्याकडून गोड करण्यात येईल का? की, आणखीनही काही दिवस या बिलाची वाट पाहावी लागणार हे येणाऱ्या काळात दिसून येईल.

## अंबाजोगाईत पंचायत विकास मॉलचा होणार भव्य दिव्य शुभारंभ

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरात पंचायत विकास मॉल चा भव्य शुभारंभ रविवार दिनांक ३१ मार्च ला भाजप नेते रमेश आडसकर यांच्या अध्यक्षतेखाली तर आ. नमिता मुंदडा, वाल्मिक अण्णा कराड यांच्या शुभहस्ते या मॉल चा उदघाटन समारंभ होणार असून पंचायत विकास मॉल च्या भव्य शुभारंभास नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन सौ वैष्णवी विनोद देशमुख यांनी केले आहे.

पंचायत विकास मॉल मध्ये सर्व प्रकारच्या इलेक्ट्रीक घंटा गाडी, वॉलपेपर, पडदे, मॅटिंग, सिलींग पिओपी शिट, जिंदाल खिडकी पट्टी, मोबाईल, टि.व्ही., कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिन्टर, फ्रीज, टेबल, खुर्ची, कपाट, एलईडी ॲडव्हटायजिंग डिस्प्ले, फॉगिंग मशिन, स्ट्रेट लाईट, सोलार लाईट, सोलार पॅनल, हायमस्ट, एलईडी लाईट, कचराकुंडी, कचरा कुंडी बॅग, हातगाडे, खेळणी, शौचालय, फायबर व प्लायवुड दरवाजे, चहा व कॉफी मशिन, सोलार पंप, ॲरो शेड, सोलार हिटर, इलेक्ट्रीक जार वाटप गाडी, जार, छतावरील पाणी पुर्नभरण, व्यायाम शाळा साहित्य, पेपर ग्लास, टॉयलेट बाथरुम साहित्य, पत्रे, लोखंड, सिमेंट, बँच, ग्रामपंचायत शाळा अंगणवाडी डिजीटल करणे. घरकुल बांधकाम, पेव्हर ब्लॉक, सिमेंट रस्ता व नाली, सिमेंट पाईप नाली, ग्रामपंचायत फेर अकारणी, ग्रामपंचायत जी.एस.टी. अकाउंटींग इत्यादी सुख सुविधा आता एकाच छताखाली मिळणार आहेत.

या शुभारंभ प्रसंगी काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमूख, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण,मा. नगरध्यक्ष राजकिशोर मोदी, मा जि.प.अध्यक्ष शिवाजीराव सिरसाट,उपनगराध्यक्ष बबन लोमटे, व्हा. चेअरमन हनुमंत मोरे,युवा नेते ऋषीकेश आडस्कर,मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया,सरपंच बाळासाहेब सोनवणे, युवानेते दीपक शिंदे,गोविंद देशमूख,सरपंच मनीषा दौडतले,प्रसाद चिक्षे, भाजप तालुकाध्यक्ष अच्युत गंगणे,तालुकाध्यक्ष अमर देशमूख, सरपंच औदुंबर मोरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर पंचायत विकास मॉलच्या शुभारंभ प्रसंगी उपस्थित राहणार आहेत.

cmyk

# पुढील हंगामापासून राज्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांची नोंदणी होणार !

पुणे : महाराष्ट्र हे देशातील आघाडीवरील ऊस उत्पादक राज्य आहे. याशिवाय उत्तरप्रदेश आणि कर्नाटक या राज्यांमध्ये देखील मोठ्या प्रमाणात ऊस उत्पादन होते. उत्पादित उसाचा वापर हा साखर उत्पादनासाठी तसेच इथेनॉल निर्मितीसाठी केला जातो. मात्र, केंद्र सरकारकडे ऊस उत्पादनाबाबत आवश्यक ती आकडेवारी उपलब्ध नसते. ज्यामुळे ऐन हंगामात उत्पादित ऊस नेमका साखर उत्पादनासाठी वापरायचा की इथेनॉल निर्मितीसाठी वापरायचा? याबाबत संभ्रम निर्माण होतो. यावर तोडगा काढण्यासाठी पुढील वर्षीच्या ऊस हंगामात महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांमध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांची नोंदणी केली जाणार आहे.

इथेनॉल निर्मितीस मदत होणार : पुढील वर्षी ऑक्टोबर २०२४ ते सप्टेंबर २०२५ च्या गाळप हंगामापासून महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी हंगामाच्या सुरुवातीलाच केली जाणार आहे. ज्याद्वारे या दोन्ही राज्य सरकारांकडून एक पोर्टल तयार केले जाईल. ज्यामध्ये ऊस खरेदी करणाऱ्या शेतकरी आणि साखर कारखान्यांचा तपशील नोंदवला जाईल. जेणेकरून साखर उत्पादनाचा अंदाज वास्तविक वेळेत आधीच काढता येईल. तसेच गरजेनुसार ऊस सरकारला इथेनॉल निर्मितीकडे वळवता येईल. असे केंद्रीय अन्न आणि ग्राहक संरक्षण मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.



उत्तर प्रदेशमध्ये 'ई-गन्ना' ॲप : सध्या घडीला उत्तरप्रदेश या आघाडीच्या ऊस उत्पादक राज्यामध्ये ही प्रणाली वापरली जात आहे. उत्तर प्रदेशमध्ये 'ई-गन्ना' या मोबाईल ॲपद्वारे राज्यातील साखर उत्पादन आणि राज्यातील एकूण कारखान्यांना होणारा ऊस पुरवठा याची नोंद ठेवली जाते. राज्यातील सुमारे ४० लाख ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी हे ॲप तयार करण्यात आले आहे. त्यामुळे उत्तरप्रदेश या राज्याचा धर्तीवर देशातील अन्य प्रमुख ऊस उत्पादक राज्य असलेल्या महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात देखील हा पॅटर्न राबविला जाणार आहे. ज्यामुळे ऊस उत्पादनाबाबत तंतोतंत माहिती आगाऊ स्वरूपात मिळण्यास मदत होणार आहे.

साखर उत्पादनात वाढ : दरम्यान, यावर्षी डिसेंबर महिन्यात केंद्र सरकारने उसापासून इथेनॉल निर्मितीवर पूर्णपणे बंदी घातली आहे. तसेच केंद्र सरकारने ३१ ऑक्टोबर २०२३ नंतर देखील साखर निर्यातीवर बंदी वाढवली होती. ज्यामुळे यंदा उत्पादन काहीसे घटले असले तरी शेवटच्या टप्प्यात ऊस उत्पादनात वाढ झाली आहे. ज्याचा थेट परिणाम साखर उत्पादनात वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. राज्यात आतापर्यंत १०२ क्विंटल साखर उत्पादन नोंदवले गेले आहे. जे ९५ लाख टन या अपेक्षित साखर साखर उत्पादनापेक्षा अधिक आहे. ज्यात आणखी हंगामाच्या शेवटापर्यंत साखर उत्पादन १०५ लाख टनांपर्यंत नोंदवले जाण्याची शक्यता आहे.

# राज्यात पाऊस, उष्णतेच्या लाटेचा इशारा

## विदर्भातील चार जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा चढला



पुणे : राज्यातील काही भागात पावसाळी वातावरण तर काही भागात उष्णतेची लाट, अशी परिस्थिती निर्माण झाली. विदर्भ चांगलाच तापत आहे. हवामान विभागाने विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला. तर काही ठिकाणी पावसाचाही अंदाज दिला.

हवामान विभागाने शुक्रवारी अकोला, अमरावती, बुलडाणा, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला होता. तर धुळे, नंदूरबार, जळगाव, नाशिक, पुणे, कोल्हापूर, सातारा, छत्रपती लातूर, धाराशिव, संभाजीनगर, जालना जिल्ह्यात काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह हलक्या पावसाचा अंदाज दिला होता. तसेच मराठवाडा आणि विदर्भातील बहुतांशी ठिकाणी तापमान वाढेल, असाही अंदाज देण्यात आला होता. आता शनिवारी नाशिक, हिंगोली, धाराशिव, लातूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज आहे. तर अकोला, बुलडाणा, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे.

देशातील बहुतांशी भागात तापमानात वाढ झाली. देशातील सर्वाधिक तापमानाची नोंद अकोला येथे झाली. तेथे ४२.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले. तर देशातील अनेक भागात तापमानाचा पारा आता ४० अंशापार पोहचला. तापमानात आणखी वाढ होऊ शकते, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

# जालना जिल्ह्यातील १०७ गावांमध्ये नवीन विहीर आणि बोअरवर बंदी

जालना : जालना जिल्हा प्रशासनाकडून विहिर आणि बोअरवर बंदी घालण्यात आलेली आहे. मागील वर्षी जिल्ह्यात कमी पाऊस झाल्याने यंदा दुष्काळाचे संकट गहिरे झाले आहे. यामुळे जालना जिल्हा प्रशासनाकडून दुष्काळी उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत. यानुसार, पाणीटंचाई असणाऱ्या १०७ गावात विहिर आणि बोअर घेण्यास बंदी घालण्यात आली आहे. या गावातील पाण्याच्या स्रोतांपासून ५०० मीटर अंतरावर दुसरा पाण्याचा स्रोत खंदण्यास बंदी घालण्यात आली आहे. याविषयीचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता आहे, अशी गावे टंचाई क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे अधिकार जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत. यंदा जिल्ह्यात दुष्काळी स्थिती असल्याने जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई सुरू आहे. पाणीटंचाई असणाऱ्या गावांमध्ये ज्या विहिंरीमध्ये पाणी उपलब्ध आहे. अशा विहिरींचे अधिग्रहण प्रशासनाकडून करण्यात आले आहे. जालना



जिल्ह्यातील१०७ गावांमध्ये विहिरींद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. यामुळे या विहिरींच्या बाजूस विहीर किंवा बोअर खंदल्यास गावाला पाणी पुरवठा सुरू असलेल्या स्रोतामध्ये पाणी शिल्लक राहणार नाही. यामुळे गावाची तहान भागवणाऱ्या विहिरीच्या बाजूला दुसरा पाणी स्रोत उभारण्यास तसेच सध्या असलेल्या विहिरीतून पाणी उपसा करण्यास प्रशासनाने बंदी घातली आहे. जिल्ह्यातील टंचाईग्रस्त १०७ गावांमध्ये ३० जूनपर्यंत पाणी उपसा करण्यास बंदी घातली आहे.

अंबड तालुक्यातील भांबेरी, दहयाळा, गंगाचिचोली, चुर्मापुरी, शिरनेर, झोडेगाव, पागीरवाडी, साष्ट पिंपळगाव, गोंदी, शहागड, वाळकेश्वर, करंजळा, वडीकाळ्या, पिठोरी सिरसगाव, भालगाव, कोठाळा खु. बदनापूर तालुक्यातील आन्वी, सिंधी पिंपळगाव, राळा (आन्दी), शेलगाव, काजळा / पानखेडा, अकोला, ढासला, असोला, हिवराराळा, खादगाव, उजैनपुरी, गोकुळवाडी, खडकवाडी, पिरसावंगी, धामनगाव या गावांचा यात समावेश आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६५ : मिर्झा राजे जयसिंग व दिलेरखान पठाण यांनी पुरंदर किल्ल्याला वेढा घालण्यास सुरूवात केली.
१८६७ : डॉ. आत्माराम पांडुरंग यांनी प्रार्थना समाजाची स्थापना केली.
१८८९ : आयफेल टॉवरचे उद्घाटन झाले. हा बांधायला २ वर्षे, २ महिने व २ दिवस लागले.
१९०१ : पहिली मर्सिडिज कार तयार करण्यात आली. ज्या ऑस्ट्रियन राजकीय अधिकार्यासाठी ती बनवली गेली, त्याच्या मुलीचे नाव या गाडीस देण्यात आले.
१९६४ : मुंबईतील विजेवर चालणाऱ्या ट्रॅम बंद झाल्या.
१९६६ : रशियाने ल्यूना-१० हा चंद्राचा पहिला कृत्रिम उपग्रह अंतराळात सोडला.
१९७० : १२ वर्षे अंतराळात भ्रमण करून एक्सप्लोअरर-१ हे अंतराळयान पृथ्वीच्या कक्षेत परतले.
२००१ : सचिन तेंडुलकर याने एक दिवसीय सामन्यात १०,००० धावा पूर्ण केल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५०४ : शिखांचे दुसरे गुरू गुरू अंगद देव यांचा जन्म. (मृत्यू: २९ मार्च १५५२)
१५१९ : फ्रान्सचा राजा हेन्री (दुसरा) यांचा जन्म. (मृत्यू: १० जुलै १५५९)
१५९६ : फ्रेन्च तत्त्वज्ञ, गणितज्ञ आणि लेखक रेनें देंकार्त यांचा जन्म. (मृत्यू: ११ फेब्रुवारी १६५०)
१८४३ : नाटककार बळवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा जन्म. (मृत्यू: २ नोव्हेंबर १८८५)
१८६५ : भारतातील पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई गोपाळराव जोशी यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १८८७)
१८७१ : स्वातंत्र्यसैनिक कर्नाटकसिंह गंगाधर बाळकृष्ण देशपांडे यांचा जन्म. (मृत्यू: ३० जुलै १९६०)
१९०२ : भारतीय विद्वान ग्यानी चेत सिंग यांचा जन्म. (मृत्यू: ३१ मार्च २०००)
१९३४ : भारतीय कवी आणि लेखक कमला सुरय्या यांचा जन्म. (मृत्यू: ३१ मे २००९)
१९३८ : दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री शीला दिक्षीत यांचा जन्म.
१९७२ : ट्विटर चे सहसंस्थापक इव्हान विल्यम्स यांचा जन्म.
१९७८ : भारतीय बुद्धिबळ खेळाडू हम्पी कोनेरू यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१३ : अमेरिकन सावकार जे. पी. मॉर्गन यांचे निधन. (जन्म: १७ एप्रिल १८३७)
१९७२ : अभिनेत्री महजबीन बानो ऊर्फ मीनाकुमारी यांचे निधन. (जन्म: १ ऑगस्ट १९३२)
१९७८ : इन्सुलिन चे सहनिर्माते चार्ल्स हर्बर्ट बेस्ट यांचे निधन. (जन्म: २७ फेब्रुवारी १८९९)
२००० : भारतीय विद्वान ग्यानी चेत सिंग यांचे निधन. (जन्म: ३१ मार्च १९०२)
२००२ : भारतीय कार्यकर्ते आणि राजकारणी मोतुरू उदायम यांचे निधन. (जन्म: १३ ऑक्टोबर १९२४)
२००४ : अकाली दलाचे नेते आणि शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीचे अध्यक्ष गुरू चरणसिंग तोहरा यांचे निधन. (जन्म: २४ सप्टेंबर १९२४)
२००४ : कोल्हापूरची कलापरंपरा जपणारे चित्र व शिल्पकलेतील दिग्गज तुकाराम केरबा ऊर्फ टी. के. अण्णा वडणगेकर यांचे निधन. (जन्म: ८ ऑगस्ट १९१२)

# हिरव्या मिरचीच्या अधिक उत्पादनासाठी वापरा ९१२ गोल्ड वाण

महाराष्ट्रीयन आहारासह भारतीय आहारात हिरव्या मिरचीला मोठे स्थान दिले जाते. हिरवी मिरची ही केवळ आहारातील मुख्य घटक नाही तर त्यामध्ये अनेक पौष्टिक घटक असतात. हिरव्या मिरचीची लागवड खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामात केली जाते. तिला बाजारात नेहमीच मोठी मागणी असते. ज्यामुळे हिरव्या मिरचीच्या लागवडीतून मोठ्या प्रमाणात कमाई केली जाऊ शकते. त्यामुळे आता शेतकऱ्यांना कमी खर्चात बियाणे उपलब्ध व्हावेत. यासाठी भारतीय बियाणे महामंडळाकडून स्वस्तात ऑनलाईन बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे.

हिरव्या मिरचीचे '९१२ गोल्ड' वाण : हिरव्या मिरचीच्या ९१२ गोल्ड या वाणाचे बियाणे तुम्ही घरबसल्या मागवू शकतात. शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी भारतीय बियाणे महामंडळाकडून (एनएससी) ओएनडीसी अर्थात डिजिटल कॉमर्ससाठी ओपन नेटवर्क सुविधा बियाणे खरेदीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्यामुळे शेतकरी एनएससीच्या माध्यमातून ऑनलाईन बियाणे खरेदी करू शकतात. या ठिकाणी अन्य प्रकारची बियाणे देखील स्वस्तात खरेदी करू शकतात.

काय आहेत या वाणाची वैशिष्ट्ये? : हिरव्या मिरचीचे '९१२ गोल्ड' हे वाण हायब्रीड असून, त्याची झाडे मजबूत असतात. फळे अर्थात मिरच्या हलक्या हिरव्या रंगाच्या आणि ८-१० सेंमीपर्यंत लांब आहेत. या वाणाची मिरची पाहिजे तितकी तिखट नसते. त्यामुळे सौम्य आहारातील व्यक्तींसाठी प्रभावी मानले जाते. तसेच, या वाणाची लागवड मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात, कर्नाटक,



महाराष्ट्र, अरुणाचल प्रदेश, ओडिशा, छत्तीसगड, तामिळनाडू, केरळ, तेलंगणा, बिहार, पश्चिम बंगाल, झारखंड, आसाम, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, हरियाणा या राज्यांमध्ये केली जाते.

किती आहे किंमत? : तुम्हालाही हिरव्या मिरचीच्या सुधारित वाणापासून हिरव्या मिरचीची शेती करायची असेल. तर तुमच्यासाठी ९१२ सुवर्ण जातीच्या संकरित मिरचीची लागवड करू शकतात. या वाणाचे १० ग्रॅमचे पॅकेट राष्ट्रीय बियाणे महामंडळाकडे ऑनलाईन पद्धतीने ४० टक्के सवलतीसह केवळ १७५ रुपयांना उपलब्ध आहे. विशेष म्हणजे तुम्ही हे बियाणे घरबसल्या ऑनलाइन ऑर्डर करू शकतात.

लागवड : हिरव्या मिरचीच्या ९१२ गोल्ड या वाणाची लागवड वर्षभरात कोणत्याही कालावधीत केली जाऊ शकते. हिरव्या मिरचीची शेती करताना त्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज असते. कारण त्यावर मावा, तुटतुडे, पांढरी माशी, घुबडा अशा रोगांच्या सर्वाधिक प्रादुर्भाव होतो. याशिवाय आपल्या घरी हिरव्या मिरचीची रोपे तयार करू शकतात. रोपांची लागवड करताना त्यात कमीत कमी दोन फुटांचे अंतर ठेवणे आवश्यक असते. आणि दोन बेडमध्ये कमीत कमी तीन फूट अंतर असावे लागते. ज्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहून, रोगांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते.

# जनावरांच्या चाऱ्यावर युरिया प्रक्रिया; जाणून घ्या पद्धत आणि फायदे

उन्हाळ्यात पशुंची विशेष काळजी घ्यावी लागते. यात चारा हा महत्त्वाचा घटक आहे. परंतु सध्या महाराष्ट्रात पाणी टंचाई आणि चारा टंचाईमुळे शेतकरी हैराण आहेत. त्यामुळे जनावरांचा चारा कसा पौष्टिक करता येईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जनावरांच्या चाऱ्यावर युरिया प्रक्रिया करणे हा एक चांगला उपाय आहे. यामुळे चाऱ्याची पौष्टिकता तर वाढतेच शिवाय शेतकऱ्यांना खर्च सुद्धा कमी येतो.

चाऱ्यावर युरिया प्रक्रिया का करावी? : सध्या पाणी टंचाईमुळे चारा पिकांची लागवड करणे कठीण झाले आहे. बरेच पशुपालक चारा टंचाईमुळे जनावरांच्या आहारात गव्हाचा पेंढा, भात पेंढा, सोयाबीन भुसकट यासारख्या दुय्यम घटकांचा जास्त वापर करतात. निकृष्ट चाऱ्यामध्ये कर्बोदकांच प्रमाण कमी आणि तंतुमय पदार्थ जास्त असतात. तसेच प्रथिने अत्यल्प असतात, त्यामुळे ती पचण्यास कठीण जातात. त्यामुळे आहाराची पौष्टिकता वाढवण्यासाठी युरिया प्रक्रिया महत्त्वाची ठरते.

युरिया प्रक्रियेचे फायदे : युरियामध्ये नत्र म्हणजेच नायट्रोजनचे प्रमाण ४६ टक्के असते म्हणून युरिया हा नत्राचा अतिशय सहज व नियमितपणे उपलब्ध होणारा स्रोत आहे. युरीया प्रक्रियेमुळे चाऱ्याची पचनक्षमता वाढते. युरिया प्रक्रिया केलेल्या चाऱ्याची चव बदलते, नत्राचे प्रमाण वाढते. त्यामुळे जनावरे चारा आवडीने खातात.

युरिया प्रक्रियेची योग्य पद्धत : गव्हाचा पेंढा, भाताचा पेंढा, उसाचे पाचट इ. चा आपण युरिया प्रक्रियेसाठी वापर करू शकतो. प्रति १०० किलो चाऱ्याच्या प्रक्रियेसाठी ४ किलो युरिया ४० लिटर पाण्यामध्ये चांगला मिसळून घ्यावा. त्यानंतर तयार झालेल्या



द्रावणात एक किलो मीठ मिसळून एकजीव करावे. सावलीत कोरड्या जमिनीवर पोते आंथरुन कुट्टी केलेला चारा एकसारखा पसरून घ्यावा. साधारणतः ६ इंच इतका चाऱ्याचा थर करावा. पसरलेल्या चाऱ्यावर झारीच्या सहाय्याने तयार केलेले मिश्रण शिंपडावे आणि चारा हलवून एकजीव करून घ्यावा. अशा प्रकारे एकावर एक थर देऊन त्यात युरिया मिश्रण मिसळून घ्यावे. चाऱ्यावर दाब देऊन चाऱ्यातील जास्तीची हवा काढून घ्यावी. ताडपत्री किंवा प्लॅस्टिक कागदाने चारा हवाबंद करून झाकून टाकावा. २१ दिवस हा चारा हवाबंद ठेवावा, कारण यावर व्यवस्थित युरिया प्रक्रिया होते. २१ दिवसानंतरच हा चारा उघडावा.

चारा जनावरांना केव्हा खायला द्यावा : युरिया प्रक्रियायुक्त चारा जनावरांना खायला देण्यापूर्वी २- ३ तास अगोदर चारा मोकळ्या हवेत ठेवावा. जेणेकरून त्यामधील अमोनिया गॅस हवेमध्ये उडून जाईल. राहिलेला चारा त्यानंतर पहिल्यासारखा हवाबंद करून ठेवावा.

सुरवातीला जनावरांच्या आहारात चारा थोड्या थोड्या प्रमाणात समाविष्ट करून हळूहळू मात्रा वाढवत न्यावी. ६ महिन्यापेक्षा कमी वयाच्या वासरांमध्ये आणि रवंथ न करणाऱ्या जनावरांना हा चारा देऊ नये.

काळजी आणि सूचना : जनावराच्या आहारात युरियाचा प्रमाणाबाहेर वापर झाला तर युरियाची विषबाधा होण्याची शक्यता असते. यामुळे जनावर दगावण्याची देखील शक्यता असते. जनावरांमध्ये अमोनियाचे प्रमाण १ मिलीग्रॅम प्रति १०० मिली रक्तापेक्षा जास्त झाले तर विषबाधा होते. गायी-म्हशीमध्ये ११६ ग्रॅम आणि मेंढीमध्ये १० ग्रॅमपेक्षा जास्त युरिया खाण्यात आला तर वेगाने जास्तीचा अमोनिया तयार होतो जो विषबाधेसाठी कारणीभूत ठरतो. म्हणून निकृष्ट चाऱ्यावर युरिया प्रक्रिया करताना ती अतिशय काळजीपूर्वक करावी लागते.

# पंकजा मुंडेंना विक्रमी मताधिक्याने निवडून आणू

## शिवसेना संपर्कप्रमुख डॉ. विजय पाटील, बापूसाहेब मोरे यांचा निर्धार ;बीडमध्ये शिवसेनेची जिल्हास्तरीय बैठक

बीड । प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार सचिव संजयजी मोरे साहेब व उपनेते अर्जुन भाऊ खोतकर यांच्या सूचनेवरून लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीडमध्ये लोकसभा संपर्कप्रमुख डॉ विजय पाटील, संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिनभैय्या मुळूक, माजी जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत काल बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे शुक्रवारी दि.२९ रोजी दु १२.०० वाजताच्या दरम्यान शिवसेनेच्या जिल्हास्तरीय बैठक पार पडली. या बैठकीसाठी बीड, माजलगाव, केज व परळी विधानसभा कार्यक्षेत्रातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







लोकसभा संपर्कप्रमुख विजय पाटील, संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिनभैय्या मुळूक माजी जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडलेल्या बैठकीत बीड शिवसैनिक तथा पदाधिकाऱ्यांनी लोकसभा निवडूणुकीवर अभ्यासपूर्ण चर्चा करून भाजपा उमेदवार पंकजाताई मुंडेंना विक्रमी मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार केला आहे. लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी अठरा पगड जातीच्या लोकांचा, शेतकऱ्यांचा आणि सर्वसामान्यांचा विचार करून त्याच्यासाठी आपले आयुष्य उगळून लावले. त्याच मुंडे साहेबांचा वसा आणि वारसा घेऊन पंकजाताई मुंडे यांनी कार्य केले. यंदा भाजपाने अत्यंत विचारपूर्वक पंकजाताई मुंडे यांना उमेदवारी घोषित केली आहे. त्यामुळे बीड शिवसेना पूर्ण ताकदीने पंकजाताई मुंडे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणण्यासाठी रात्रीचा दिवस आणि दिवसाची रात्र करून आम्ही सर्वजण हाडाची काड करत सर्व काम करेल असा निर्धार शिवसेना संपर्कप्रमुख डॉ विजय पाटील, बापूसाहेब मोरे यांनी शिवसेनेच्या संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय बैठकीत शिवसैनिकांनी केला आहे. या बैठकीदरम्यान शिवसेना पदाधिकारी सुनिल सुरवसे, संतोष जाधव, राजाभैय्या पांडे, बाळासाहेब कुरुंद, किसनदादा कदम, गजानन मुडेगावकर, साहेबराव पोपळे, गणेश उगले, तुकाराम बाप्पु येवले, ऋषिकेश लोमटे, प्रताप म्हात्रे, व्यंकटेश शिंदे यांनी आपल्या भाषणात पंकजाताई मुंडे यांना निवडून आणण्यासाठी शिवसेना सज्ज असल्याचे सांगितले. दरम्यान लोकसभा संपर्कप्रमुख विजय पाटील, संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिनभैय्या मुळूक, माजी जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांनी आपल्या भाषणात शिवसैनिक तथा पदाधिकाऱ्यांची निवडणुकीपूर्वी आपण भाजपा लोकसभा उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्याशी बैठक करू असे सांगितले. या बैठकीसाठी बीड जिल्हा शिवसेना उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहर प्रमुख, उपतालुकाप्रमुख ,उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख , सर्कल प्रमुख शाखाप्रमुख व शिवदूत तसेच , महिला आघाडी, युवा सेना, अल्पसंख्याक आघाडी, वैद्यकीय मदत कक्ष ,शेतकरी संघटनांचे सर्व पदाधीकारी , आजी माजी लोकप्रतिनिधी ,पदाधीकारीमोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## हरिओम घोडके यांच्या पुण्यस्मरण निमित्त खाऊ वाटप

म्हसोबावाडी



आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील हरिओम घोडके यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त जिल्हा परिषद शाळेतील मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.

अधिक माहिती अशी की, सुलेमान देवळा येथील रहिवाशी असलेले हरिओम दिगंबर घोडके यांचे गेल्या वर्षी अपघाती निधन झाले होते.धार्मिक सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असलेले हरिओम घोडके ग्राम पंचायत सदस्य होते.गेल्या वर्षी दुर्दैवाने अपघाती निधन झाले.प्रथम वर्ष श्राद्ध निमित्त हरिओम वर प्रेम करणाऱ्या युवकांनी श्रद्धांजली म्हणून शाळेत मुलांना खाऊ वाटप केला.यावेळी दिपक दादा डहाळे पंडित अण्णा घोडके शिवम घोडके विशाल घोडके माऊली घोडके राजू पठाण अक्षय घोडके अनिल ओव्हाळ राहुल भादवे बाळू घोडके पवन येवले वैभव पोटरे मुख्याध्यापक चव्हाण सर लगड सर साळुंखे सर काळे सर दातीर सर म्हस्के सर गव्हाने सर जाधव सर म्हस्के मॅडम आदि उपस्थित होते.

## तुलसी महाविद्यालयात मौखिक रोग तपासणी शिबिर

### दातांची काळजी घ्या -डॉ. अशोक उनवणे

बीड । प्रतिनिधी

शरीराच्या सर्व भागांची काळजी घेण्यासाठी आपण खूप प्रयत्न करतो मात्र अनेकदा दातांची नीट काळजी घेतली जात नाही ही बाब लक्षात घेऊन दातांची काळजी घ्या असे आवाहन डॉ. अशोक उनवणे यांनी केले. या मौखिक रोग तपासणी शिबिरास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे शनिवार दि.३० मार्च रोजी सकाळी ११:०० वा. मौखिक रोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये प्रमुख सहाय्यक म्हणून मुखरोग व चेहरा शल्यचिकित्सक डॉ. अशोक उनवणे, डॉ.अनघा उनवणे यांना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तुलसी महाविद्यालय प्राचार्य डॉ.एल.एम.थोरात, प्रमुख अतिथी उपप्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे,आय. क्यू.सी.ए. समन्वयक डॉ. योगिता लांडगे, कार्यक्रम अधिकारी विद्यार्थी कल्याण विभाग प्रमुख प्रा.समिर मिर्झा यांची उपस्थिती होती.




पुढे बोलतांना डॉ.अशोक उनवणे म्हणाले की,सहसा जेव्हा आपण दातांच्या काळजीच्या छोट्या छोट्या गोष्टींकडे दुर्लक्ष करू लागतो तेव्हा दात पिवळे पडणे, पायरिया, पोकळी होणे, हिरड्यांमधून रक्तस्त्राव होणे आणि तोंड खराब होणे अशा समस्या दिसू लागतात त्यावर लवकरात लवकर निदान करणे गरजेचे आहे असे डॉ. अशोक उनवणे यांनी सांगितले. तसेच या समस्या दूर करण्यासाठी उपयोजना त्यांनी सांगितल्या. दातांच्या काळजीसाठी काय करावे. रोज गोड पदार्थ खाल्ले किंवा दातात चिटकणाऱ्या गोष्टी खाल्ल्या तर बॅक्टेरिया वाढण्याची संधी मिळेते हे उघड आहे, ज्यामुळे दातांमध्ये एकाच वेळी अनेक प्रकारच्या समस्या दिसू लागतात दातांची घाण दूर व्हावी आणि बॅक्टेरिया जमा होऊ नयेत असे वाटत असेल तर सकाळी उठल्यानंतर आणि रात्री झोपण्यापूर्वी टूथब्रशने दात स्वच्छ करा जे असे करत नाहीत त्यांच्यासाठी अडचण आहे. तसेच गुटखा आणि तंबाखू चघळणे ही केवळ सामाजिक कुप्रथा नसून यामुळे दात, हिरड्या आणि जिभेचे खूप नुकसान होते, हल्ली तरुणांपासून वृद्धांपर्यंत लोक या व्यसनाला बळी पडले आहेत ही वाईट सवय लवकर सोडली पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. दातांची कितीही काळजी घेतली तरी महिन्यातून एकदा किंवा दोनदा डेंटिस्ट कडे तपासणी करावी यामुळे दातांच्या छोट्या-छोट्या समस्या ओळखल्या जाऊ शकतात आणि मग तुम्ही लवकरात लवकर उपाय करू शकता असे डॉ.अशोक उनवणे यांनी सांगितले. या मौखिक रोग तपासणी शिबिराचे आयोजन विद्यार्थी कल्याण विभाग यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.किशोर वाघमारे यांनी मानले याप्रसंगी तुलसी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी,विद्यार्थी, विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांची मौखिक आरोग्य तपासणी करण्यात आली.



**माजलगाव: शहरातील आझाद नगर येथील सामाजीक कार्यकर्ते शेख फेरोज यांचा मुलगा फुरखान फेरोज शेख याने वयाच्या नवव्या वर्षी आपल्या आयुष्यातील पहिला उपवास (रोजा) पूर्ण केला असता त्याचे कुटूंबीयासह नातेवाईकांकडून कौतुक केले जात आहे.**

## मुलाच्या जन्मदिनी माणुसकीचे मूल्य संवर्धित

माजलगाव । प्रतिनिधी

वाढदिवस म्हंटल की, अमाप खर्च होतो.मात्र या खर्चाला फाटा देऊन पत्रकार बाळासाहेब अडागळे यांनी त्यांचा मुलगा आयुष याचा वाढदीवस अगदी कौतूकास्पद साजरा केला. हा जन्मदिन मुख बधिर विद्यालयातील मुलांना शैक्षणिक साहित्य अन्? खाऊचे वाटप करुन साजरा केला.त्यामुळे माणुसकीचे मूल्य संवर्धित झाले असून पत्रकार बाळासाहेब अडागळे यांचे कौतूक होत आहे.

माजलगाव शहरातील जनार्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचिलीत मुख बधिर विदयालय आयोजित ववाढदिवस कार्यक्रमास उद्योजक राम राठोड, सुनिल डोंगरे, रविकांत राठोड, अनिल खंडागळे, नारायण राठोड, प्रचंड सोळंके, मुख्याध्यापक ए.एम.ढास,, एम. आर अधीक्षक पाटील, यु.एम आगळे, आर.बी. सुतार, आदी उपस्थित होते. यावेळी आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी प्रत्येकानी आपल्या वाढदिवसाचा व्यर्थ खर्च गोरगरीब मुलांसाठी खर्च करावा, महाराष्ट्राची आदर्श संस्कृती दाखून द्यावी असे मत सर्व प्रमुख पाहुण्यानी व्यक्त केले. यावेळी आश्रमातील विदयार्थ्यांना शालेय साहित्य , खेळाचे साहित्य,गोड जेवण देण्यात आले. यावेळी बहूसंख्ये विद्यार्थी उपस्थित होते. माजलगाव तालुक्यातील पत्रकार परमेश्वर सोळंके, अमर साळवे, वाहेद पठाण,बाळासाहेब उपाडे, पृथ्वीराज निर्मळ,विजय कापसे,सिद्धेवर गायकवाड, शेख मुजफर यांच्यासह आदींची उपस्थिती होती.



वाढदिवसाच्या दिवशी आर्थिक उधळपट्टी करीत वाढदिवस साजरा करणारे अनेक जण असतात.पण मुकबहिर लहान मुला-मुलींच्या चेहर्यावर माझ्या मुलाचा वाढदिवसाच्या दिवशी आनंद फुलविणारे फारच कमी असतात. 'वाढदिवस' लहान मुला मुलीं बरोबर साजरा केला आणि जगातील सगळ्यात सुंदर गिफ्ट त्यांनी मला दिल ते म्हणजे 'आनंद' आणि 'समाधान या मुला-मुलींच्या चेहर्यावरील हास्य फुलल्याने माझ्या आयुष बाळाचा वाढदिवस खर्या अर्थाने साजरा झाला. **-बाळासाहेब आडागळे**

## राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ माजलगाव नूतन तालुका कार्यकारिणी जाहीर

### तालुका अध्यक्षपदी अमर साळवे यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ माजलगाव नूतन तालुका कार्यकारिणी बैठकीचे आयोजन दि. २८ मार्च २०२४ रोजी येथील व्यंकटेश हॉल येथे करण्यात आले होते. या बैठकीमध्ये सर्वानुमते राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ माजलगाव तालुका अध्यक्षपदी अमर साळवे यांची निवड करण्यात आली.

राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ माजलगाव तालुका कार्यकारणी घोषित करून संघास बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष श्री. संतोष निकम, प्रदेशाध्यक्ष निलेश पाटील, महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष प्रा. डॉ. दशरथ रोडे, राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत कांबळे, बीड जिल्हा अध्यक्ष उत्तम ओव्हाळ यांच्या आदेशावरून राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ बीड जिल्हा कार्याध्यक्ष पृथ्वीराज निर्मळ यांच्या अध्यक्षतेखाली दि. २८ मार्च २०२४ रोजी



१०:३० वा. राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ माजलगाव नूतन कार्यकारिणी बैठकीचे आयोजन व्यंकटेश हॉल येथे करण्यात आले होते. तेव्हा या बैठकीमध्ये पत्रकार संघाचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष पृथ्वीराज निर्मळ यांनी सर्वानुमते नूतन कार्यकारिणी जाहीर केली. या कार्यकारिणीमध्ये युवा व निर्भीड पत्रकार अमर साळवे यांची तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष विजय डावरे, सचिव अलीम सय्यद, कार्याध्यक्ष दर्शन डोंगरे, कोषाध्यक्ष वैभव झगडे, सदस्य राम जगताप, निलेश गरुड, राज जागीरदार यांची निवड करण्यात आली. यावेळी तालुका नूतन कार्यकारिणीच्या सर्व पदाधिकारी सदस्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या बैठकीस ज्येष्ठ पत्रकार अरविंद ओव्हाळ, विष्णू उगले सह निर्भीड पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष परमेश्वर सोळंके, संतोष रासवे यांची विशेष उपस्थिती होती.

## माऊलींच्या जल अमृताने पक्ष्यांना दिलासा

### दुष्काळात भागते तहान, आत्माराम चौधरींचे कौतुकास्पद कार्य

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील आत्माराम चौधरी यांचे अध्यात्मिक कार्यात ओळख असून माऊली या नावाने ते परिचित आहेत. त्यांचे पशुपक्षांसाठीही मोलाचे कार्य असून त्यांनी तयार केलेल्या पाण वठ्यातील जल अमृताने पक्षांना दुष्काळात मोठा दिलासा मिळत आहे. चौधरी यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कल्याण ते विशाखापट्टणम हा राष्ट्रीय महामार्ग पाडळसिंगी शिवारातून जातो. याच महामार्गावर पाडळसिंगी ते मादळमोही दरम्यान आत्माराम बाबुराव चौधरी यांची शेत जमीन आहे. शेतीला हंगामी पाणी असून इतर वेळेत शेतीबरोबरच चौधरी हे रसवंतीचा व्यवसाय करतात, मात्र सध्याची दुष्काळी परिस्थिती, वाया गेलेली पिके, पाण्याची टंचाई, उन्हाची वाढती तीव्रता आणि पशु पक्षांसह माणसालाही पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, यामुळे पाण्याचे महत्व सर्वांच्याच लक्षात येऊ लागले, परंतु या परिस्थितीमध्ये पशुपक्ष्यांचे सर्वात मोठे पाण्यासाठी हाल होत आहेत. पाण्यासाठी दाही दिशा फिरावे लागत आहे, तरीही पक्षांना पाणी मिळत नाही, पक्षांचा माने अभावी तडफडून मृत्यूही होतो हे पाहून आत्माराम चौधरी यांनी महामार्गतच असलेल्या झाडावर टाकाऊ वस्तु पासून जसे की फुटलेल्या माठाचा भाग प्लॅस्टिक यापासून पक्षांसाठी पाणवठे तयार केले. या पानवाठ्यात नियमित पाणी टाकले जाते. या पाणवठ्यांमुळे परिसरातील पक्षांना व जनावरांना जल अमृत मिळत असून त्यांची तहान भागवली जात आहे सध्याच्या तीव्र पाणीटंचाईत या पक्षांना व जनावरांना मोठा दिलासा मिळत आहे.

आत्माराम चौधरी हे गत आठ ते दहा वर्षापासून हा उपक्रम राबवत असून या उपक्रमाचे महत्त्व आतापर्यंत कोणाच्या लक्षात आले नाही, मात्र या वर्षीच्या तीव्र दुष्काळाने महामार्गावरून जाणाऱ्या प्रत्येकाच्या नजरा या पाणवठ्यांकडे वळत आहेत आणि चौधरी यांनी केलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. त्यांनी केवळ पाणी आणि चारा याचा विचार न करता परिसरात काही प्रमाणात वृक्ष लागवड केलेली आहे, त्यांचे आध्यात्मिक क्षेत्रातही मोठे योगदान असून गजानन महाराजांचे शेगाव व साई शिर्डी या ठिकाणी पाडळसिंगी येथून जात असलेल्या पालख्यांमध्येही त्यांचा सहभाग असतो एक मनमिळाऊ व्यक्तिमत्व आणि दुःखितांच्या मदतीसाठी धावून जाणारी वृत्ती यामुळे ते माऊली या नावाने परिसरात परिचित आहेत.





### पक्ष्यांची किलबिल हाच आशीर्वाद

महामार्ग लगत माझा रसवंती व्यवसाय असून सावलीच्या उद्देशाने विविध प्रकारचे वृक्ष लागवड केलेली आहे या ठिकाणी विविध पक्षी व त्यांची किलबिल कानी पडते त्यांची तहान भागविण्यासाठी पानवटे तयार केल्याने त्या पक्षांची किलबिल कायम कानी पडते आणि मन प्रसन्न होते यातच परमेश्वर प्राप्ती चा भास होतो, त्यामुळे ही किलबिलच मी आशीर्वाद समजतो.

**-आत्माराम चौधरी, पाडळसिंगी**

## संत सावता महाराज मंदिरासाठी सहकार्य करू - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर



बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांनी श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्टच्या विनंतीला मान देऊन दि.२९ रोजी नियोजित श्री संत सावता महाराज मंदिर बांधकामास भेट दिली. क्षीरसागर यांच्या प्रयत्नातून न.प. च्या माध्यमातून संस्थानला मोठी जागा उपलब्ध झाली आहे. त्यांच्याच प्रयत्नातून सुमारे पन्नास लाख रुपये निधीतून तयार होत असलेल्या सांस्कृतिक सभागृहाची त्यांनी पाहणी करून गुत्तेदाराला काही महत्त्वाच्या सूचना केल्या.

याप्रसंगी जयदत्त आण्णांचा संस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ते म्हणाले की, हे प्रतिष्ठान माळी समाजासाठी ऊर्जा केंद्र बनावे. आपण येथून पुढे देखील यासाठी आर्थिक सहकार्य करू, संरक्षण भिंतीची मागणी पूर्ण करू असे आश्वासन दिले. या प्रसंगी प्रा.लक्ष्मण गुंजाळ, मोहन गोरे, लक्ष्मण ढवळे, दिनकर जमदाडे, श्याम घाडगे, निखिल शिंदे, संतोष गवळी, चंद्रसेन मन्यारी पाटील, गोरख आखाडे इत्यादींची उपस्थिती होती. मा. क्षीरसागर यांच्यासोबत जि.प.चे माजी सदस्य विलास बडगे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिनकर कदम, नानासाहेब काकडे आदी उपस्थित होते.

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

रविवार, दि.३१ मार्च २०२४ | ६



# आगामी काळात डॉ.योगेश क्षीरसागरांच्या पाठीशी उभी राहणार -पंकजाताई मुंडे

## » महायुतीच्या लोकसभा उमेदवार पंकजाताई मुंडे यांची डॉ.योगेश क्षीरसागरांच्या निवासस्थानी भेट

**बीड । प्रतिनिधी**

माझा डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्याशी सुसंवाद असायचा. मुंडे आणि क्षीरसागर कुटुंबियांचे ऋणानुबंध आहेत. डॉ. योगेश क्षीरसागर यांच्यासारखे सुशिक्षित, सुसंस्कृत राजकारणी बीड जिल्ह्याच्या राजकारणात असल्याचा मला आनंद आहे. या निवडणुकीत मला सहकार्य करा, आगामी काळात मी डॉ.योगेश क्षीरसागरांच्या पाठीशी उभी राहणार असल्याची ग्वाही भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी दिली. बीड शहरातील क्षीरसागर यांच्या निवासस्थानी पंकजाताई मुंडे यांनी शनिवारी (दि.३०) लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सदिच्छा भेट दिली. स्वागतप्रसंगी पंकजाताई मुंडे या बोलत होत्या.

यावेळी माजी नगराध्यक्षा डॉ.दिपाताई क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, प्रदेश महामंत्री सलीम जहांगीर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर





यांच्यासह भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, नगरसेवक, प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.पुढे बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाले की, आज स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या जयंतीदिनी अभिवादन करण्यासाठी आले. एका महिलेला ४० वर्ष काकूने राजकीय गड राखला, त्याचा नितांत आदर आहे. काकू रुग्णालयात असताना मी भेटायला गेले होते. स्व.गोपीनाथ मुंडे साहेबांवर पुत्रवत प्रेम केले. साहेबांचा जयदत्तअण्णांशी थोडा संघर्ष होता, तरीही काकू भेटल्यावर मायेने बोलत. डॉ.भारतभूषण क्षीरसागर हे नगराध्यक्ष असताना त्यांनी नगरपालिकेतील सभागृहाला स्व.गोपीनाथ मुंडे यांचे नाव दिले. हे त्यांनी स्वतःहून केले याचा मनस्वी आनंद आहे. क्षीरसागर कुटुंबियांशी आमचे अनेक पिढ्यापासून संबंध आहेत. मला निवडणुकीत सहकार्य करा. यापुढे आपण डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी उभी राहणार आहे, अशी ग्वाही पंकजाताई मुंडे यांनी दिली. पुढे त्या म्हणाल्या, बीड मतदारसंघात भरीव विकासनिधी दिला आहे. रस्त्यांचे जाळे निर्माण केले आहे. विकासाचे राजकारण करण्यावर आपला कायम भर राहिला आहे. मी विरोधकांना देखील निधी दिला. मी केवळ स्व.गोपीनाथ मुंडे यांची कन्या म्हणून मतदान देऊ नका. माझे काम पाहून मतदान करा. स्व.केशरकाकू यांनी रेल्वेचा पाया रचला. त्यानंतर खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांनी रेल्वे कामाला गती दिली, लवकरच रेल्वे मार्गाचे काम पूर्ण करू, असे आश्वासन दिले. मुस्लिम समाजाचे यापूर्वी अनेकदा सहकार्य केले. समाजाचे हे सहकार्य आपण कदापिही विसरू शकत नाही. यापुढेही सहकार्य मिळेल असा विश्वास आहे. जातपात, धर्म सर्वकाही बाजूला ठेवून विकासासाठी मतदान करा.

### ताई, खासदार होणारच, केंद्रीय ग्रामविकासमंत्री होऊन सत्कारासाठी या-डॉ.योगेश क्षीरसागर

विकासप्रिय नेतृत्व म्हणून पंकजाताई यांच्याकडे पहिले जाते. त्यांनी ग्रामविकास मंत्री म्हणून राज्यात प्रभावी कार्य केले. खासदार म्हणून आपण निवडून येणारच आहात. आता केंद्रात मंत्री होऊन पुन्हा एकदा सत्कारासाठी आमच्या घरी या, अशा शब्दात डॉ. योगेश क्षीरसागर यांनी शुभेच्छा दिल्या. पुढे बोलताना ते म्हणाले की, बीड मतदारसंघातील विकासाचे प्रश्न सोडविणे गरजेचे आहे. बीड बायपास, स्लिप रोड, प्रस्तावित रिंग रोड प्रश्न सोडवावा. मतदारसंघात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झालेली असून वॉटरग्रीड योजना कार्यान्वित करण्याची गरज आहे. खासदार म्हणून आपण निवडून या आणि आम्हाला भरीव निधी द्या. शहरातील मराठा भवनसाठी बीड नगरपरिषदेने जागा उपलब्ध करून दिली असून त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. आतापर्यंत आमच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी आमची जात पाहिली नाही, अगदी तसेच आमचे कार्यकर्ते देखील तुमचे काम करतील, अशा शब्द डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिला.

मला जेवढे मते द्याल, ते प्रत्येक मत कर्ज समजून काम करेल. आम्ही दररोज जनमानसात आहोत, आता सर्व मित्र पक्ष ताकदीने सोबत असल्याने आमची ताकद वाढली आहे. आपण नारायण गड ते गहिनीनाथ गडाचा विकास करण्यासाठी भरीव निधी दिला. विकासाचा समतोल राखण्याचा कायम प्रयत्न केला आहे. कुणी मतदान केले, नाही हे कधीही पाहिले नाही. मायनस असलेल्या बुथवर देखील मी निधी दिला, असे मत व्यक्त केले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले. पंकजाताईंना मताधिक्य देण्याचा पदाधिकाऱ्यांनी शब्द दिला. बीड मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाहू महाराजांच्या विजयासाठी उद्धव ठाकरे मैदानात

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून राजकीय नेत्यांनी प्रचारसभांचा धडाका लावला आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सर्वाधिक उमेदवार निवडून यावेत, यासाठी उद्धव ठाकरे ठिकठिकाणी प्रचारसभा घेत आहेत. येत्या २ मे रोजी उद्धव ठाकरे कोल्हापुरात जंगी सभा घेणार आहेत. कोल्हापूर लोकसभेसाठी महाविकास आघाडीने श्रीमंत शाहू महाराज यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. त्यांच्या विजयासाठी उद्धव ठाकरे यांनी कोल्हापुरात सभा घेण्याचे ठरविले आहे.

पुढील काही दिवस राज्यातील सर्वच लोकसभा मतदारसंघ पिंजून काढण्याचा प्लान उद्धव ठाकरेंनी आखला आहे. सध्या कोल्हापूर लोकसभा मतदारसंघ महायुतीकडे आहे. याठिकाणी शिवसेना शिंदे गटाचे संजय मंडलिक हे विद्यमान खासदार आहेत. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत मंडलिक यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार धनंजय महाडिक यांचा जवळपास पावणेतीन लाख मतांनी पराभव केला होता. शिवसेनेत फूट पडल्यानंतर संजय मंडलिक यांनी शिंदे गटाला पाठिंबा दिला. त्यामुळे कोल्हापुरातील शिवसेनेत दोन गट पडले. त्यामुळे यंदाच्या



### २ मे रोजी कोल्हापुरात जंगी सभा घेणार

निवडणुकीत कोल्हापूर लोकसभेची जागा महाविकास आघाडीकडून काँग्रेसला सोडण्यात आली आहे. काँग्रेसने या जागेवर श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांना उमेदवारी जाहीर केली आहे. दरम्यान, संजय मंडलिक यांना शह देण्यासाठी आणि शाहू महाराज यांच्या प्रचारासाठी उद्धव ठाकरे २ मे रोजी कोल्हापुरात जंगी सभा घेणार आहेत. त्यामुळे या सभेत उद्धव ठाकरे काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. या सभेनंतर ३ मे रोजी उद्धव ठाकरे कणकवली मतदारसंघात सभा घेणार आहेत. कणकवलीतून ठाकरे गटाने विनायक राऊत यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

# भाजपकडून जाहीरनामा समिती गठीत

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने गठीत केलेल्या जाहीरनामा समितीची शनिवारी (दि.३०) घोषणा करण्यात आली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी नड्डा यांनी या समितीची घोषणा केली. भाजपने जाहीर केलेल्या यादीत इतर पक्षांतून नुकतेच भाजपमध्ये दाखल झालेल्या अनेक नेत्यांच्या नावांचाही समावेश असल्याचे म्हटले आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपची जोरदार तयारी सुरु आहे. निवडणुकीसाठी सर्वप्रथम उमेदवारांची पहिली यादी भाजपनेच जाहीर केली होती. त्यानंतर केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकांचा सपाटा सुरू आहे आणि उमेदवार निश्चितच प्रक्रिया वेगाने सुरू आहे. निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी लागणाऱ्या जाहीरनाम्यासाठी भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी जाहीरनामा समितीची घोषणा केली. लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने गठीत केलेल्या समितीचे अध्यक्ष संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आहेत. तसेच अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना निमंत्रक म्हणून पक्षाने जाबाबदारी दिली आहे. तर केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल सह संयोजक आहेत. विविध सदस्यांच्या माध्यमातून जवळपास सर्व राज्यांच्या नेत्यांना या समितीमध्ये प्रतिनिधित्व दिले आहे. या समितीमध्ये चार राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचीही नावे आहेत. या संदर्भातील माहिती भाजपने त्यांच्या अधिकृत एक्स अकाऊंटवरून दिली आहे.



### या २७ सदस्यांचा समावेश

भाजपच्या या २७ सदस्यीय समितीमध्ये जवळपास सर्व राज्यातील नेत्यांना प्रतिनिधित्व दिले आहे. महाराष्ट्रातून पियुष गोयल आणि विनोद तावडे या दोन नेत्यांचा यामध्ये समावेश आहे. याव्यतिरिक्त केंद्रीय मंत्री अर्जुन मुंडा, अर्जुन राम मेघवाल, अश्विनी वैष्णव, धर्मेंद्र प्रधान, स्मृती इराणी, राजीव चंद्रशेखर, किरण रीजीजू, भूपेंद्र यादव, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चव्हाण, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साय, राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे, आसामचे मुख्यमंत्री हेमंत विश्वा शर्मा, उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य, ज्येष्ठ भाजप नेते रविशंकर प्रसाद, सुशील मोदी, राधा मोहनदास अग्रवाल, जुआल ओरम, ओ. पी. धनकड, मनजिंदर सिंह सिरसा, अनिल अँटनी, तारीक मन्सूर यांचा समावेश आहे.

# शिवसेनेचे तुकाराम येवले यांच्या निवासस्थानी महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांची भेट

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांच्या निवासस्थानी बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवार भाजपा राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी दि. २९मार्च रोजी भेट देवून मतदारांशी संवाद साधला.

यावेळी उपस्थित भाजपा नेते रमेशराव आडसकर, उपजिल्हाप्रमुख नितीन मुंदडा, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, मा. जि.प. सदस्य बबनराव सरवदे,मा.नगराध्यक्ष डॉ. अशोकराव तिडके, भाजपचे तालुका अध्यक्ष अरूनराव



राऊत, मनसे महिला आघाडी जिल्हा अध्यक्षा रेखा अंबुरे, भगवानराव धरपडे, नारायणराव सातपुते,अशोकराव डोणे, पत्रकार संतोष जेथलिया, ज्ञानोबा सर कुकडे, दत्तात्रय सातपुते, भगवानराव राठोड, विशाल देवकते, वसंत आलकुंटे, बाळू शेठ गिल्डा, विलास नेमाने,श्यामराव पांचाळ,सचिन टाक,राम क्षीरसागर, शेषेराव अबुज,ॲड. विलास राठोड, सुशील हांडे,भागवत गायकवाड,मलिकार्जून खुर्पे, केशव गायकवाड, दशरथ सातपुते,विनायक सोनटक्के, सुशिल हाडे, माऊली वाघमारे,राजेश जाधव,प्रशांत टमके, ग्रा.प.सदस्य गणेशराव सातपुते, सुरेश चौरे, बाळू औटे, सत्यप्रेम खेत्रे, विठ्ठल गाते, भारत बोडके, बबलू गाते, पिंटू येवले, भैया येवले, शशिकांत डहाळे, साहेबराव चव्हाण, श्याम मोगरे व प्रभगातील नागरिक, महील मंडळ उपस्थित होते.

# हेमामालिनींविरोधात बॉक्सर विजेंद्र सिंह ?

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

काँग्रेस पक्ष मथुरा लोकसभा मतदारसंघातून भारताचा ऑलिम्पिक पदक विजेता माजी बॉक्सर आणि काँग्रेस नेता विजेंद्र सिंह यांना उमेदवारी दिली जाईल, अशी चर्चा आहे. सलग दोनवेळा लोकसभा निवडणूक जिंकलेल्या अभिनेत्री हेमामालिनी यांच्यासमोर विजेंद्र सिंह याचे आव्हान असणार आहे.

दोनवेळा खासदार राहिलेल्या चित्रपट अभिनेत्री हेमा मालिनी यांना भाजपने उमेदवारी दिली आहे. त्यांना 'आरएलडी'चाही पाठिंबा आहे. मथुरा लोकसभा जागेसाठी दुसऱ्या टप्प्यात म्हणजेच २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीचा निकाल



४ जूनला लागणार आहे. हेमामालिनी यांनी २०१४ आणि २०१९ मध्ये मथुरा लोकसभेतून विजय मिळवला होता. मागील लोकसभा निवडणुकीत हेमा मालिनी यांच्याविरोधात १२ उमेदवार रिंगणात होते. काँग्रेसने महेश पाठक, राष्ट्रीय लोकदलाने कुंवर नरेंद्र सिंह, स्वतंत्र जनता पक्षाने ओम प्रकाश यांना उमेदवारी दिली होती. मात्र हेमा मालिनी यांनी विजय मिळवला होता. २०१४ मध्येही हेमामालिनी येथे विजयी झाल्या होत्या. भाजपने हेमामालिनी यांना सलग तिसऱ्यांदा मथुरा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. याठिकाणी काँग्रेस पक्ष बॉक्सर विजेंद्र सिंग यांना उमेदवारी देऊ शकते, अशी चर्चा सुरु आहे. त्यांच्या नावावर पक्षात मंथन सुरू आहे. या जागेसाठी आणखी काही नावे शर्यतीत असल्याचे बोलले जात आहे, मात्र विजेंद्र सिंह यांचे नाव आघाडीवर आहे. काँग्रेसने २८ मार्च रोजी यूपीच्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली होती. त्यानंतर काँग्रेसने डॉली शर्माला गाझियाबादमधून उमेदवारी दिली होती.

# आरएसएसचा अजेंडा हाणून पाडण्यासाठी भीमशक्तीचा काँग्रेस आघाडीला पाठिंबा

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्ष पूर्ण होत असून भारताला हिंदू राष्ट्र बनवणे व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेली राज्यघटना बदलणे हा त्यांचा अजेंडा आहे. भाजपाचा ४०० पारचा नारा हा दोन तृतियांश बहुमतासाठी असून, एवढे बहुमत मिळाले की भाजपा राज्यघटना बदलणार हे भाजपाचे नेतेच जाहीरपणे सांगत आहेत. आरएसएस व भाजपाचा हा अजेंडा हाणून पाडण्यासाठी भिमशक्ती काँग्रेस आघाडीला पाठिंबा देत असल्याचे भिमशक्तीचे संस्थापक अध्यक्ष, खासदार चंद्रकांत हंडोरे यांनी जाहीर केले आहे.

चेंबूरच्या नालंदा हॉल येथे भीमशक्तीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या



### संस्थापक अध्यक्ष, खासदार चंद्रकांत हंडोरे यांची घोषणा

बैठकीला काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी ऑनलाईन संबोधित केले. बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना चंद्रकांत हंडोरे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत सत्ता स्थापन करण्यास २७२ खासदार लागतात परंतु भाजपाने अब की बार ४०० पार चा नारा दिला आहे. ४०० जागांवर विजय मिळवण्यामागचा भाजपाचा हेतू दोन तृतियांश बहुमत मिळवणे व त्यानंतर डॉ. बाबासाहेबांच्या राज्यघटनेला हात घालून ते बदलणे हा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राज्यघटना बदलल्यानंतर आरएसएसचा मनुवादी अजेंडा लागू होईल. भाजपाचा हा डाव हाणून पाडण्यासाठी भिमशक्तीने महाविकास आघाडी व इंडिया आघाडीच्या पाठीशी उभे राहण्याचा ठराव पास केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली राज्यघटना वाचवणे हे आंबेडकरी जनतेची जबाबदारी आहे. काँग्रेस पक्ष राज्यघटना वाचवण्याचा प्रयत्न करत आहे. खासदार राहुल गांधी यांनी राज्यघटना व लोकशाही वाचवण्यासाठी देशभर पदयात्रा काढून जनजागृती केली आहे. भाजपाचे षडयंत्र हाणून पाडण्यासाठी भिमशक्तीचे कार्यकर्ते दलित समाजात जनजागृती करतील, घरोघरी जातील, तालुका, जिल्हा, गावा-गावात जातील. भिमशक्तीचे संस्थापक अध्यक्ष खासदार चंद्रकांत हंडोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत भिमशक्तीचे कार्याध्यक्ष व नाशिकचे माजी महापौर अशोक दिवे, भिमशक्ती मध्य प्रदेशचे अध्यक्ष सुनिल बोरसे, गोवा प्रदेश अध्यक्ष ज्ञानेश्वर वारखेडकर, ज्येष्ठ उपाध्यक्ष दिनकर ओकार, उपाध्यक्ष नामदेव पिंपळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष शशिकांत बनसोडे, सरचिटणीस गोपाळराव नेत्रपाळे, सरचिटणीस रवी सोनकांबळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

### वंचितचा फटका काँग्रेस आघाडीला बसणार नाही

ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्याबद्दल आदरच आहे परंतु राज्यघटना वाचवण्यासाठी आंबेडकरी जनतेने एकत्र आले पाहिजे. वंचित बहुजन आघाडीला २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत जेवढी मते मिळाली होती तेवढी मते विधानसभा निवडणुकीत मिळाली नाहीत. या दोन निवडणुकीत त्यांच्या मतांमध्ये मोठी घसरण झाली आहे. आता २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचा काँग्रेस आघाडीला फटका बसेल असे वाटत नाही असेही चंद्रकांत हंडोरे म्हणाले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text.
Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com
Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26
NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मतदार यादीत कोणताही दोष नाही; तांत्रिक त्रुटींची तात्काळ दुरुस्ती-जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांचे स्पष्टीकरण

**पुणे । प्रतिनिधी**

मतदार यादी विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हा निवडणूक प्रशासनाने मतदार यादी शुद्धीकरणासाठी विशेष प्रयत्न केले असल्याने मतदार यादीत कोणतेही दोष नसून काही ठिकाणी आढळलेल्या तांत्रिक त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे स्पष्टीकरण जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी दिले आहे. नागरिकांनी मतदार यादीबाबत काही शंका असल्यास नागरिकात संभ्रम होईल अशी माहिती इतरत्र न देता प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

भोर विधानसभा मतदारसंघातील काही नावे गुजरातीत असल्याबाबत आलेल्या तक्रारीनंतर काही माध्यमांनी 'मतदार यादीत घोळ', 'मतदार यादीत अनेक नावे बोगस लावली' अशा आशयाचे वृत्त दिले आहे. म्हाळुंगे येथील संतोष मोहोळ यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे हे वृत्त देण्यात आले आहे. श्री.मोहोळ यांनी आपल्या तक्रारीत म्हाळुंगे येथील मतदार यादी क्रमांक १०४ ते १०९ मधील अनेक मतदारांची नावे गुजराती भाषेत आहेत. तसेच एका मतदाराचे नाव म्हणुन मंदिराचे नाव यादीत आहे. याबाबत बोगस मतदार असण्याची शक्यता व्यक्त करून चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली होती. प्रशासनाने त्याच दिवशी अर्थात २७ मार्च रोजी पत्राची तात्काळ दखल घेवून श्री.मोहोळ यांना प्रशासनाने यापूर्वीच केलेल्या कार्यवाहीविषयी पत्राद्वारे माहिती दिली होती.

निवडणूक आयोगाच्या निर्देशान्वये एका ठिकाणी मतदार यादीत असलेल्या व्यक्तीला दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित होण्यासाठी नमुना अर्ज क्र. ८ (स्थलांतर/पत्त्यात बदल) भरता येतो. राज्यातील विविध भागातून तसेच वेगवेगळया राज्यातून मुळशी तालुक्यातील हिंजवडी, सूस, म्हाळुंगे, बावधन बु., माण, मारूंजी या भागात रोजगार, नोकरी व्यवसाय निमित्त स्थलांतर होत असल्याने तेथील नागरीक या भागात रहिवासास आल्यानंतर ऑनलाईन पद्धतीने नमुना अर्ज क्र. ८ (स्थलांतर/पत्त्यात बदल) भरत असतात. प्रस्तुत प्रकरणात ३ मतदार हे सद्यस्थितीत सदर यादी भागाचे सर्वसाधारण रहिवाशी असून ते या यादी भागात रहिवासास येण्यापुर्वी गुजरात राज्यात रहिवासासाठी होते. त्यांनी मतदार यादीच्या संक्षिप्त पुर्नरिक्षण कार्यक्रमाअंतर्गत ऑनलाईन पद्धतीने नमुना अर्ज क्र. ८ सादर केल्यांनतर त्यासोबत जोडलेले रहिवासाचे कागदपत्रे तपासून सदर अर्ज स्विकृत करण्यात आला. त्यानंतर मतदाराचा पूर्वीच्या मतदार यादीतील ठिकाणचा इंग्रजी भाषेतील तसेच तेथील स्थानिक भाषेतील नावाचा तपशील इकडील कार्यलयास प्राप्त होतो. त्यामुळे सदर मतदार हे या यादी भागात समाविष्ठ झाल्यानंतर संगणकीय प्रणालीवरील सुविधेच्या आधारे त्यांची नावे स्थानिक भाषेत रूपांतरीत करण्यात येत असतात. आतापर्यंत बाहेरच्या राज्यातून अशा प्रकारे स्थलांतरित झालेल्या मतदारांच्या नावाचे स्थानिक भाषेत रूपांतरण करण्यात आले आहे. ही प्रक्रिया ही निरंतर स्वरूपाची आहे.

वृत्तात यादी भागात एका महिला मतदाराच्या नावाबाबत उल्लेख करण्यात आला आहे. हे नाव यादी भागात पुर्वीपासून होते. सदर महिला मतदाराच्या नावाच्या तपशीलामध्ये नावाऐवजी सर्वसाधारण रहिवास पत्त्याच्या जवळचा परिसर म्हणून तेथील स्थानिक मंदिराचे नाव अर्जदार यांचेकडून अर्जात भरले गेल्याने ते नाव मुद्रीत झाले होते. त्यानंतर मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाकडून मतदारांच्या स्थानिक रहिवासाची पडताळणी सुरू असताना सदर मतदार स्थलांतरीत झाले असल्याबाबत निदर्शनास आले आहेत. त्यांचे नाव कमी करणेसाठी अर्ज क्र. ७ भरून घेण्यात आला आहे. या यादी भागातील जे मतदार त्यांच्या सर्वसाधारण रहिवासाच्या ठिकाणी येत नसतील त्यांची निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार स्वतंत्र एसडी (अनुपस्थित/स्थलांतरीत/मृत) अशी यादी तयार करण्यात आली असल्याचे स्पष्टीकरण जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे देण्यात आले आहे. निवडणुका नि:ष्पक्ष आणि पारदर्शक वातारणात पार पाडण्यासाठी प्रशासन कटीबद्ध असून मतदार यादी पूर्णत: शुद्ध आणि त्रुटी विरहीत राहील यासाठी प्रशासनातर्फे सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे. नागरिकांनीदेखील अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.दिवसे यांनी केले आहे.

# पशुखाद्याची दरवाढ: दूध उत्पादक शेतकरी संकटात

**वाल्हे । प्रतिनिधी**

मागील वर्षी एप्रिल महिन्यात दुधाला प्रतिलिटर ३८ रुपये भाव होता. या वर्षी तो तब्बल १३ रुपये कमी होऊन २५ रुपये इतका झाला आहे. तर, दुसरीकडे पशुखाद्यांच्या किमती मात्र वाढतच आहेत, त्यामुळे दूध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.



राज्य सरकारने एप्रिल २०२३ मध्ये दुधाला किमान दर ३८ रुपये प्रतिलिटर देण्याचे आश्वासित केले होते. त्यानंतर ऑगस्ट महिन्यात प्रतिलिटर ३४ रुपये दर निश्चित केला. सप्टेंबर महिन्यापासून दुधाच्या दरात सतत घसरण होऊन जानेवारी २०२४ मध्ये अनुदानाच्या माध्यमातून हा दर ३० रुपयांवर आणण्यात आला. मात्र, दूध उत्पादक शेतकर्यांना प्रतिलिटर ५ रुपये अनुदान योजनेतील दूध अनुदानाचे पैसे अनुदान कालावधी संपूनही जवळपास २० दिवस झाले तरी बँक खात्यात जमा झाले नाही.

शासनाकडून दूध अनुदान कालावधी संपल्यानंतर दूध खरेदीदराचा निर्णय बदलला गेला. २७ रुपये प्रतिलिटर असलेला खरेदीदर २५ रुपयांवर आणला गेला. मात्र, या निर्णयामुळे शेतकर्यांना मोठा तोटा झाला. ही बाब तीव्र दृष्काळात दूध उत्पादक शेतकरीवर्गासाठी घातक असल्याची प्रतिक्रिया शेतकर्यांमधून व्यक्त होत आहे

# दिवसा घरफोडी करणारी मुंबईची टोळी चतु:श्रृंगी पोलिसांकडून गजाआड, २० लाखांचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात दिवसा घरफोडी करुन लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने चोरुन नेणाऱ्या मुंबईतील सराईत गुन्हेगारांच्या टोळीला चतु:श्रृंगी पोलिसांनी अटक केली आहे. अटक केलेल्या दोन आरोपींकडून २० लाख १४ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम व इतर साहित्य जप्त केले आहेत.

गुन्ह्याचा तपास करुन चतु:श्रृंगी पोलिसांनी नालासोपारा, पालघर येथून मोहमद रईस अब्दुल आहद शेख (वय-३७ रा. तैयबा मस्जिद जवळ, मालवणी, मुंबई), जोगेश्वरी पुर्व येथून मोहमद रिजवान हनीफ शेख (वय-३३ रा. जोगेश्वरी पुर्व, मुंबई) यांना अटक केली आहे.

२३ फेब्रुवारी रोजी सकाळनगर, बाणेर रोड परिसरात दोन ठिकाणी घरफोडी झाली होती. याबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दाखल गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास पथकाने परिसरातील सीसीटीव्ही तपासले व तांत्रिक विश्लेषण केले. त्यावेळी आरोपी मुंबई परिसरात राहत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने मुंबईत जाऊन दोघांना अटक केली. त्यांची पोलीस कस्टडी घेऊन सखोल चौकशी करुन मुंबई येथे जाऊन ३० तोळे सोन्याचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल फोन, गुन्ह्यात वापरलली कटावणी, पोपट पाना व स्क्रू ड्रायव्हर असा एकूण २० लाख १४ हजार ३६४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

अटक करण्यात आलेले आरोपी रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. मोहमद शेख याच्यावर ३० पेक्षा जास्त घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. तर मोहमद रिजवान शेख याच्यावर सहा पेक्षा जास्त घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक नरेंद्र पाटील करीत आहेत.

ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त प्रवीण पवार, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त विजय मगर, सहायक पोलीस आयुक्त आरती बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कुलकर्णी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) युवराज नांद्रे, सहायक पोलीस निरीक्षक नरेंद्र पाटील, पोलीस उपनिरीक्षक रुपेश चाळके, पोलीस अंमलदार सुधीर माने, श्रीकांत वाघवले, बाबुलाल तांदळे, किशोर दुशिंग, मारुती केंद्रे, इरफान मोमीन, बाबा दांगडे, प्रदीप खरात, श्रीधर शिर्के, विशाल शिर्के, संदिप दुर्गे व बाळासाहेब भांगले यांच्या पथकाने केली.

# शिरूर मतदारसंघात अजित पवारांना धक्का, भोसरीचे माजी आमदार विलास लांडे नाराज, साथ सोडणार?

**पुणे । प्रतिनिधी**

शिंदेंच्या शिवसेनेतील माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना आपल्या पक्षात प्रवेश देऊन अजित पवार यांनी शिरूरमधून उमेदवारी दिली आहे. यामुळे भोसरीचे माजी आमदार विलास लांडे नाराज झाले आहेत. ते अजित पवारांची साथ सोडून शरद पवारांच्या राष्ट्रवादी जाणार, अशी चर्चा आहे. जर लांडे यांनी साथ सोडली तर शिरूरमध्ये अजित पवारांना मोठा धक्का बसू शकतो. लांडे यांच्याबाबत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी देखील संकेत दिले आहेत.

विलास लांडे हे शिरूर लोकसभा मतदारसंघातून लढवण्यास इच्छूक होते. आढळराव पाटीलांसारख्या आयात केलेल्या नेत्याला उमेदवारी देऊ नये, असे म्हणत त्यांनी विरोध केला होता. पण त्यांचा विरोध डावलून आढळरावांना अजित पवारांनी पक्षात घेऊन उमेदवारी दिली. यामुळे लांडे हे नाराज आहेत.

भोसरी येथे प्रचारासाठी आले असताना शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी लांडे यांच्याबाबत वक्तव्य केले आहे. ते म्हणाले, महाराजांची शिकवण आहे की 'मोहीम फत्ते झाल्यानंतर निकाल दिसला पाहिजे, मोहिमेची वाच्यता नको', असे म्हणत त्यांनी लांडे हे संपर्कात असल्याचे संकेत दिले. त्यामुळे लांडे हे शरद पवार गटात जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# जुन्या वादातून मित्रावर कोयत्याने वार, पुणे येथील पांडवनगर परिसरात भरदिवसा थरार

**पुणे । प्रतिनिधी**

जुन्या वादाचा राग मनात धरुन मित्राला चहा पिण्यासाठी बोलावून घेत डोक्यात कोयत्याने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना पुण्यातील पाडंवनगर येथे घडली आहे. ही घटना शुक्रवारी (दि.२९) दुपारी साडेतीन ते पावणे चार वाजण्याच्यादरम्यान गोलंदाज चौकाजवळ घडली. याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



याबाबत जखमी शंकर बादशहा मिरेकर (वय-४२ रा. जुनी वडारवाडी, पुणे) यांनी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरुन किशोर गोविंद धोत्रे (वय-३६ रा. वैदुवाडी पोलीस चौकी समोर, शंकरमठ, हडपसर) याच्यावर आयपीसी ३०७, ५०४, ३४ आर्म ऍक्ट, महाराष्ट्र पोलीस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, शंकर मिरेकर आणि किशोर धोत्रे असे दोघे ही जणं या घटनेत जखमी झाले असून हे सगळं कृत्य पूर्ववैमनस्य आणि एका महिलेशी असलेल्या अनैतिक संबंधातून घडल्याचे प्राथमिक तपासातून निष्पन्न झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि फिर्यादी ऐकमेकांचे मित्र आहेत. त्यांच्यात पूर्वी वाद झाला होता. याचा राग किशोर धोत्रे याच्या मनात होता. शुक्रवारी दुपारी साडेतीन वाजता आरोपीने शंकर याला चहा पिण्यासाठी बोलावुन घेतले. त्यानंतर त्याच्यासोबत वाद घालून टोकदार लोखंडी रॉडने पायाच्या पिंडरीजवळ व मानेवर खुपसुन जखमी केले. त्यानंतर शिवीगाळ करत गाडीच्या डीकीतुन कोयता काढून शंकरच्या डोक्यात वार करुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आरोपी तेथून पळून गेला. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक केकान करीत आहे.

# उजनी बनले बेकायदा मांगुर माशांचे पालन केंद्र

**भिगवण । प्रतिनिधी**

बेकायदा वाळू उपशानंतर नंबर लागतो तो बेकायदेशीर मांगुर मासे पालनाचा.अधिकार्यांच्या आशीर्वादाने संपूर्ण भारत देशात व महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक बेकायदेशीर मांगुर मासे पालनाचे केंद्र उजनी बनले आहे. मांगुर मासा आरोग्याला अतिशय हानीकारक असून, इतर माशांच्या प्रजातीसाठी घातक असल्याने हरित लवादाने संपूर्ण भारतात या माशाच्या पालन व विक्रीवर बंदी घातली आहे. हे मासे खाल्ल्याने कॅन्सरसह गंभीर आजारांना आमंत्रण देतो. उजनी आधीच प्रदूषणाच्या विळख्यात सापडली असताना या माशांचे पालन उजनीच्या मुळावर उठले आहे.

देशी मांगुर पालनाच्या नावाखाली उजनीत उघडपणे थाय मांगुर माशांची शेती केली जात आहे. यामध्ये काही खासगी मालकीच्या शेती वगळता उजनी संपादित जागेवर जवळपास सहाशे एकराहून अधिक जागेत या बेकायदेशीर मांगुरची शेती सुरू आहे. यासाठीही मोठा राजाश्रय व अधिकार्यांचा वरदहस्त लाभला आहे. धक्कादायक बाब म्हणजे याची विक्री ही मुंबई,नेपाळ,आंध-प्रदेशात केली जाते. यातून वर्षाकाठी शंभर ते दीडशे कोटीहून अधिक रुपयांची उलाढाल होत असल्याने यामध्ये राजकीय नेत्यांचे बगलबच्चे उतरले आहेत.



दुसरी धक्कादायक बाब म्हणजे या माशाला कुजलेले अन्न म्हणून चिकन वेस्टज वापरले जाते व हे वेस्टज पुणे,कराड,सोलापूर, धाराशिव शहरांतून तसेच पोल्ट्री फार्म,लहान-मोठे विक्रेते, शॉप यातून खुलेआम पुरवले जाते.

या मांगुर माशाचा उगम दक्षिण आफ्रिकेत झाला असला, तरी आरोग्याचे धोके लक्षात घेता तेथे बंदी घालण्यात आली व कालांतराने त्याचा प्रवास भारताच्या दिशेने झाला. परंतु इथेही आरोग्याचे धोके लक्षात घेता भारततही त्यावर हरित लवादाने कायमची बंदी घातली आहे. तरीही हा व्यवसाय सुरुवातीला छुप्या पद्धतीने देशात पसरला आणि आता आपले कोणी काहीच बिघडवत नाही यावरून याला राजाश्रय मिळतोय म्हटल्यावर धंद्याने भरारी घेतली. कालांतराने बर्याच राज्यांनी कटाक्षाने बंदी घालत व्यवसायाला लगाम घातला.परंतु महाराष्ट्रात या व्यवसायाने बघता बघता हातपाय पसरले. यातील अर्थकारण पाहून याला चालना मिळाली आणि उजनी बेकायदेशीर मांगुर माशांचे देशातील व राज्यातील सर्वात मोठे कोठार बनले आहे. याचे बीज आंध्र प्रदेश, मध्यप्रदेश, वेस्ट बंगालमधून आणून उजनीत संगोपन केले जात आहे. यासाठी उजनी संपादित जागेचा बेकायदा वारेमाप वापर, वीज चोरी, पाणी चोरी सर्रासपणे केली जात आहे.

# जेजुरीत चार दिवसांतून एकदा पाणी; 'हंडा मोर्चा'चा इशारा

**जेजुरी । प्रतिनिधी**

खंडोबा देवाच्या जेजुरीनगरीत भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. शहरात चार दिवसांतून एकदा पाणी येत आहे. त्यामुळे जेजुरीकरांवर पाण्याच्या शोधात भटकण्याची वेळ आली आहे. नगरपालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्याने पाणीटंचाई निर्माण झाली आहे. नियमित पिण्याचा पाणीपुरवठा न झाल्यास 'हंडा मोर्चा' काढण्याचा इशारा महिलावर्गाने दिला आहे. जेजुरी शहराला नाझरे धरण आणि मांडकी डोहातून पिण्याच्या पाण्याची योजना आहे. नाझरे धरण पूर्णपणे कोरडे पडल्याने या योजनेतून जेजुरीला पाणी बंद झाले आहे. तातडीची पाणी योजना असणार्या मांडकी डोहावरील योजना गेली तीन ते चार वर्षे नादुरुस्त होती.



सध्याच्या पाणीटंचाईच्या काळात ही योजना दुरुस्त करण्यात आली आहे. जेजुरीला दररोज पाणी देण्यासाठी ६० लाख लिटर पाण्याची आवश्यकता आहे. गेले वर्षभर ४ दिवसांआड पिण्याचे पाणी नगरपालिकेकडून पुरविले जात होते. मात्र, एक महिन्यापासून पाण्याचे वेळापत्रक कोलमडून गेल्याने पाण्यासाठी नागरिक हैराण झाले आहेत. सध्या जेजुरी पाणीपुरवठा केंद्रापासून राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असल्याने मांडकी डोहावरून आलेली जलवाहिनी फुटली असून, पाणीपुरवठा होत नसल्याचे नगरपालिकेकडून सांगितले जात आहे. गेले ८ ते १० दिवस तीव्र पाणीटंचाईमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पाण्यासाठी जेजुरीकरांना वणवण फिरावे लागत आहे. पाण्याची मागणी वाढल्याने टँकरही उपलब्ध होत नाहीत तसेच नागरिकांना जारचे पाणी दररोज विकत घ्यावे लागत आहे. नगरपालिका प्रशासनाला पाण्याचे नियोजन करता आले नसल्याने पाणीटंचाईचे संकट कोसळल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. मांडकी डोह योजना सुरू झाल्यानंतर दोन दिवसांआड पाणी दिले जाईल, ही घोषणा कागदावरच राहिली असून, पुढील काळात पाणीटंचाई आणखी तीव्र होणार आहे.

# झोमॅटो कंपनीमध्ये डिलिव्हरी बॉयचे काम करणाऱ्याकडून हॉस्टेलमधील मुलांच्या लॅपटॉपची चोरी :वारजे पोलिसांकडून साडेचार लाखाचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात शिक्षण घेण्यासाठी आलेल्या तरुणाने झोमॅटो कंपनीमध्ये डिलिव्हरी बॉयचं काम सुरु केले. मात्र, डिलिव्हरी करताना हॉस्टेलमधील मुलांचे लॅपटॉप चोरी करण्यास सुरुवात केली. वारजे माळवाडी पोलिसांनी वसतीगृहातील मुलांचे लॅपटॉप चोरणाऱ्याला अटक करुन ४ लाख ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन ५ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

तेजस दत्तात्रय सुर्यवंशी (वय-२३ रा. मगनपुरा, नवामोंढा, जि. नांदेड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. वारजे माळवाडी पोलीस ठाण्यातील तपास पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार हद्दीत पेट्रोलींग करत असताना आरोपी तेजस याला ताब्यात घेतले. तेजस एक वर्षांपूर्वी पुण्यात डि.एम.एल.टी. शिक्षण घेण्यासाठी आला. शिक्षण घेत असताना त्याने झोमॅटो कंपनीमध्ये डिलिव्हरी बॉयची नोकरी करण्यास सुरुवात केली. डिलेव्हरीचे काम करताना कोणत्या ठिकाणी मुलांचे हॉस्टेल आहेत, मुले कधी बाहेर जातात, कधी रुमवर परत येतात याची माहिती मिळवली. त्यानंतर त्याने संधी साधून हॉस्टेलवर जाऊन तेथे राहणाऱ्या मुलांचे लॅपटॉप, मोबाईल चोरी करण्यास सुरुवात केली. वारजे माळवाडी पोलिसांनी त्याच्याकडे सखोल तपास करुन ९ लॅपटॉप, ३ मोबाईल, १ दुचाकी असा एकूण ४ लाख ६२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी तेजस याने वारजे माळवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून तीन लॅपटॉप, तीन मोबाईल, एक स्मार्टवॉच चोरले आहे. तसेच अलंकार पोलीस ठाण्याच्या हद्दीतून तीन लॅपटॉप, सिंहगड रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन लॅपटॉप चोरले. तर नांदेड जिल्ह्यातील मुखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दुचाकी चोरल्याचे निष्पन्न झाले आहे.



ही कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त प्रविण पवार, अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग प्रविणकुमार पाटील, पोलीस उपायुक्त परिमंडळ-३ संभाजी कदम, सहायक पोलीस आयुक्त भिमराव टेळे यांच्या आदेशाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोज शेडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) निळकंठ जगातप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक रणजित मोहिते, पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर पार्वे, पोलीस अंमलदार प्रदीप शेलार, भुजंग इंगळे, विजय भुरुक, बंटी मोरे, मनोज पवार, श्रीकांत भांगरे, संभाजी दराडे, विक्रम खिलारी, शिरीष गावडे, अजय कामठे, शरद पोळ, सत्यजित लोंढे व रियाज शेख यांच्या पथकाने केली.

# पिंपळवंडी येथे बिबट्यांच्या हल्ल्यात तीन शेळ्या मृत्यूमुखी

**आळेफाटा । प्रतिनिधी**

पिंपळवंडी (ता. जुन्नर) शिवारातील लेंडेमळा येथे बिबट्याने केलेल्या हल्ल्यात तीन शेळ्या ठार झाल्याची घटना शनिवारी (दि. ३०) पहाटे घडली.



जुन्नर तालुक्याचे पूर्व भागात बिबट्यांचे हल्ल्यात पाळीव प्राणी व पशुधन ठार होत असल्याच्या घटना दिवसागणिक वाढतच असून यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पिंपळवंडी परिसरातील रेडगाव धरणाचे कुकडी कालव्यालगत असलेल्या खालचे लेंडेमळा येथे उमेश कारभारी लेंडे यांच्या घरालगतच्या गोठ्यात असलेल्या शेळ्यांवर बिबट्यांनी शनिवारी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास हल्ला केला.

या हल्ल्यात गोठ्यातील तीन शेळ्या जागीच ठार झाल्या. शेळ्यांच्या आवाजाने लेंडे यांना जाग आली. ते व त्यांचे बंधू विजय लेंडे यांनी घराबाहेर येत बॅटरीचा झोत गोठ्यावर मारला असता त्यांना तिथे बिबट्या दिसून आला. यानंतर आरडाओडा केल्याने बिबट्याने लगतच्या उसात धूम ठोकली. पहाटे साडेचारच्या दरम्यान गोठ्याच्या ठिकाणी बिबट्या आला होता.

आळे वनपरिक्षेत्रचे वनपाल संतोष साळुंखे यांनी घटनास्थळी जात घटनेचा पंचनामा केला आहे. दोन बिबट्यांनी हा हल्ला केल्याचे उमेश लेंडे यांनी सांगितले. परिसरात बिबट्यांचा वावर असून काही दिवसांपूर्वी संकरित गायीचे एक वासरू देखील त्याच्या हल्ल्यात ठार झाले होते. बिबट्यांचा या परिसरात वावर असल्याचे नागरिकांनी सांगितले. यामुळे बिबट्याचे भय कायम असल्याचे या घटनेवरून दिसून येते.